मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

# दैनिक युवक आधार

तरुणांचा बुलंद आवाज मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२४ ■ शनिवार, २५ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# आम आदमी पक्षात मोठी फूट

## राघव चड्ढा भाजपामध्ये सामील, दोन-तृतीयांश खासदारांचा पाठिंबा असल्याचा दावा

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षात (आप) फूट पडली आहे. आपचे खासदार राघव चड्ढा यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राघव चड्ढा यांच्यासह खासदार संदीप पाठक आणि खासदार अशोक मित्तल यांनी देखील भाजपात प्रवेश केला आहे. संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांच्यासोबत पत्रकार परिषदेला संबोधित करताना खासदार राघव चड्ढा यांनी सांगितलं की, “राज्यसभेतील आम आदमी पक्षाचे दोन-तृतीयांश सदस्य म्हणून आम्ही भारताच्या संविधानातील तरतुदींचा वापर करून भाजपामध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे.”

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून राघव चड्ढा हे भाजपामध्ये सामील होणार असल्याची चर्चा सुरू होती. अशात आता राघव चड्ढा यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. तसंच हरभजन सिंग, स्वाती मालीवाल, राजिंदर गुप्ता आणि विक्रम साहनी हे देखील आपल्यासोबत येतील, असा दावा राघव चड्ढा यांनी केला आहे. ते म्हणाले, “राज्यसभेत आम आदमी पक्षाचे 10 खासदार आहेत, त्यापैकी दोन-तृतीयांशाहून




अधिक आमच्यासोबत आहेत. त्यांनी स्वाक्षरी केली असून, आज सकाळी आम्ही स्वाक्षरी केलेले पत्र आणि कागदपत्रे राज्यसभा अध्यक्षांकडे सादर केली आहेत. त्यापैकी तिघं तुमच्यासमोर उपस्थित आहेत. आमच्या व्यतिरिक्त हरभजन सिंग, राजिंदर गुप्ता, विक्रम साहनी आणि स्वाती मालीवाल हे देखील आहेत.”

पुढं राघव चड्ढा यांनी सांगितलं की, “पक्षाच्या कार्यातून स्वतःला दूर ठेवण्यामागचं खरं कारण मी तुम्हाला सांगत आहे. मला त्यांच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी व्हायचं नव्हतं. मी त्यांच्या मैत्रीस पात्र नव्हतो, कारण मी त्यांच्या गुन्ह्यांमध्ये सामील नव्हतो. आमच्याकडे फक्त दोनच पर्याय होते. एकतर राजकारण सोडून गेल्या 15-16 वर्षांत केलेलं लोकसेवेचे काम सोडून देणं किंवा आमची ऊर्जा आणि अनुभव सकारात्मक राजकारणासाठी वापरणं. त्यामुळं आम्ही ठरवलं आहे की, भारतीय संविधानातील तरतुदींचा वापर करून राज्यसभेतील आपचे दोन-तृतीयांश सदस्य भाजपामध्ये विलीन होतील.” दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वी आपनं राज्यसभेतील आपल्या नेतृत्व रचनेत मोठा बदल करत राघव चड्ढा यांना उपनेतेपदावरून हटवलं होतं. एकेकाळी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या सर्वात विश्वासू सहकाऱ्यांपैकी एक मानल्या जाणाऱ्या राघव चड्ढा यांना अचानक राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवल्यामुळं राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आलं होतं.

## संक्षिप्त

### सोन्याचे पदक चोरले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : 80 वर्षीय महिलेच्या गळ्यातील 35 हजार रुपये किमतीचे सोन्याचे पदक चोरल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 19 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मंगलाबाई भोईर या नितळस येथे राहत असून 18 एप्रिल रोजी त्यांचे कुटुंबीय हळदीसाठी गेले होते. रात्री नऊच्या सुमारास त्या घरामध्ये बसल्या होत्या. रात्री साडेनऊच्या सुमारास एक अनोळखी पुरुष त्यांच्याजवळ आला आणि त्यांच्या कडील सोन्याचे पदक गळ्यातून खेचून तो अंधारात पळून गेला.

### महिलेला चाकूने आणि लोखंडी स्टिकने मारून केले जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : रस्त्यावरील क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून चाकू आणि बेसबॉल लोखंडी स्टिकने मारून जखमी केल्याप्रकरणी कारचालका विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 23 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.पायल चौधरी या रिसवाडी येथे राहत असून त्या 23 एप्रिल रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास मोटरसायकल वरून कळंबोली येथून रसायनी येथे घरी जात होत्या. पावणे एकच्या सुमारास डी मार्ट समोर पळस्पे फाटा जवळून जात असताना दुसऱ्या गाडीला जाण्यासाठी रस्ता कमी पडत होता. यावेळी त्यांच्या पाठीमागून चार चाकी गाडी ओव्हरटेक करायला लागला. यावेळी त्याने शिवीगाळ केली आणि कार मधून चालक खाली उतरला. त्याने डिकी मधून लोखंडी स्टिक आणि चाकू घेऊन आला आणि पायलच्या हातावर मरून तिला जखमी केले.

### फॉरेक्स ट्रेंडिंगमध्ये अधिकच्या परताव्याचे आमिष दाखवून 28 लाखांची केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : फॉरेक्स ट्रेंडिंग मध्ये अधिकच्या परताव्याचे आमिष दाखवून चौघांची 28 लाख 40 हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी सचिन बापू गुंजाळ (राहणार गंगोत्री सोसायटी सेक्टर 21 कामोठे) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 20 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.शिवशंकर यादव हे सेक्टर एक, करंजाडे येथे राहत असून त्यांची ओळख सचिन गुंजाळ यांच्याशी झाली. यावेळी फॉरेस्ट ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवून दर महिन्याला परतावा म्हणून चार ते सहा टक्के रक्कम देत असल्याचे समजले. यावेळी त्याने त्याचे फॉरेस्ट ट्रेंडिंगचे खाते दाखवले. त्यावेळी पैसे बुडाले तर लोकांचे पैसे कसे देणार असे विचारले असता त्याच्याकडे भरपूर प्रॉपर्टी आहे ती विकून लगेच तो लोकांचे पैसे देईल असे त्यांनी सांगितले होते. त्यामुळे शिवशंकर यांनी एक लाख रुपये गुंतवले. त्यावेळी दर महिन्याला तो सहा टक्के परतावा देत होता. त्यामुळे शिवशंकर यांनी सहा लाख 82 हजार रुपये गुंतवले. मार्च 2024 पर्यंत नियमित परतावा मिळाला. मात्र त्यानंतर परतावा मिळाला नाही. त्याने वेगवेगळे कारणे सांगितली. त्याला संपर्क केला असता उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्याच्या नवीन कार्यालयास भेट दिली असता त्याने वेगवेगळी कारणे सांगितली. त्याला फोन केले असता त्याने फोन उचलले नाही आणि मोबाईल नंबर ब्लैक लिस्टला टाकला. त्याच्या खारघर येथील कार्यालयाला भेट दिली असता ते ऑफिसही बंद केले होते. अशा प्रकारे शमा परवीन यांची १५ लाख रुपये, सुमित जा यांची पाच लाख 54 हजार रुपये, विलास कांबळे यांची एक लाख एक हजार रुपयांची फसवणूक केल्याचे त्यांना समजले.

## देवणी तालुक्यात तलाठी संघटनेचा बेमुदत संप; शेतकरी व विद्यार्थ्यांच्या कामांवर परिणाम

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी तालुका ग्राम महसूल संघटना (तलाठी) संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी दिनांक 20 एप्रिल 2026 रोजी तहसील कार्यालय देवणी येथे तलाठी संघटनेने निवेदन सादर केले. यावेळी तालुका तलाठी संघटनेचे अध्यक्ष बालाजी केंद्रे, सचिव धनराज भंडारे, उपाध्यक्ष




ज्ञानबा करमले, कार्याध्यक्ष महेश पट्टेवाड, जिल्हा प्रतिनिधी लक्ष्मण कांबळे, सल्लागार डी.डी. पवार, संघटक गौरी काळे, मार्गदर्शक गणेश हिवरे व प्रतिनिधी शंकर जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

तलाठी संघटनेच्या बेमुदत संपामुळे तालुक्यातील महसूल संबंधित कामांवर मोठा परिणाम होत असून शेतकऱ्यांची सातबारा उतारे, फेरफार नोंदणी तसेच विद्यार्थ्यांच्या शाळेशी संबंधित कामांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनाने या प्रश्नावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी तलाठी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. देवणी तालुका तलाठी संघटना ही महाराष्ट्रातील सुरू असलेल्या राज्यव्यापी संपात सक्रियपणे सहभागी झाली असून, मागण्या मान्य होईपर्यंत संप सुरू ठेवण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

## बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : 23 एप्रिल रोजी खारघर रेल्वे स्टेशन या ठिकाणी बेशिस्त ऑटो रिक्षा चालक संबंधाने विशेष कारवाई करिता खारघर वाहतूक शाखा व प्रादेशिक परिवहन विभाग, पनवेल विभाग यांची संयुक्त कारवाई मोहीम आयोजित करण्यात आली.या विशेष कारवाईमध्ये एकूण 65 बेशिस्त ऑटो रिक्षा चालक तसेच इतर वाहन चालकांविरुद्ध मोटर वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान फिटनेस संपलेल्या 2 ऑटोरिक्षा पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. यावेळी खारघर वाहतूक शाखेचे वपोनी मुजावर तसेच पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार व निरीक्षक शितोळे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक पवार, वाहतूक शाखेचे पोउपनी शिदोरे व 6 अंमलदार हजर होते.

## दैनिक युवक आधारच्या बातमी ची दखल..!

### मानुर ग्रुपग्रामपंचायत बडेवाडी मधील रखडलेले रस्त्याचे काम तातडीने चालु

**दैनिक युवक आधार**

**राम ढाकणे उरण रायगड** : पत्रकार राम ढाकणे यांच्या माध्यमातून दैनिक युवक आधार मध्ये प्रसारित झालेल्या बातमी ने मानुर ग्रुपग्रामपंचायत मध्ये खळबळ उडाली , आणि बडेवाडी गावामध्ये रखडलेली कामे पूर्ण करण्यात वेग वाढून, तेथील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून देण्याचे संबंधित अधिकारी यांनी बडेवाडी मधील ग्रामस्थांना आश्वासन दिले.

मानुर ग्रुपग्रामपंचायत च्या संबंधित बडेवाडी येथील रस्त्याच्या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येताच येथील



रहिवाशी उद्धव सानप व बडेवाडी मधील ग्रामस्थांनी दैनिक युवक आधार चे पत्रकार राम ढाकणे यांच्याशी संपर्क करून, त्या संबंधित घडलेल्या भ्रष्टाचार ची माहिती दिली, सध्या महाराष्ट्र भर तेजीने उभारी घेत असलेले "दैनिक युवक आधार" तसेच "न्यूज पोर्टल चॅनल" च्या माध्यमातून पत्रकार राम ढाकणे यांनी बातमी देत बडेवाडी गावामधील रस्त्याच्या कामामध्ये घडलेल्या भ्रष्टाचार चा दाखला अन्य काही न्यूजपेपर मध्ये सुद्धा प्रसारीत केला.

बातमी बघताच मानुर ग्रुपग्रामपंचायत मध्ये खळबळ उडाली, लगेचच सरपंच व संबंधित गुत्तेदार यांनी या बातमीची दखल घेत, तातडीने कामाला सुरूवात केली आहे, आणि लवकरच काम पूर्ण करून देऊ असे आश्वासन मानुर ग्रौपग्रंपांचात चे सरपंच यांनी बडेवाडी गावातील ग्रामस्थांना दिले आहे.

बडेवाडी गावातील ग्रामस्थानी तरुणांचा बुलंद आवाज "दैनिक युवक आधार" व न्यूज पोर्टल चैनल चे कौतुक करत, तुमच्या बातमी मुळे आज बडेवाडी गावावर झालेला अन्यायाला न्याय मिळत आहे...! सर्व ग्रामस्थांनी मनापासून धन्यवाद देत आभार व्यक्त केले.

## श्रीवर्धनमध्ये विकासकामांना गती ; खासदार सुनील तटकरे यांचा पाहणी दौरा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित :** श्रीवर्धन मतदारसंघाचे खासदार माननीय सुनील तटकरे यांनी आज श्रीवर्धन शहर व तालुक्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा पाहणी दौरा करत प्रगतीचा आढावा घेतला.या दौऱ्यात भुवनाले तलाव, समुद्रकिनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधारा, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक ‘शिवसृष्टी’ तसेच पेशव्यांचे स्मारक या महत्त्वाच्या प्रकल्पांना भेट देऊन कामांची पाहणी करण्यात आली. विविध प्रकल्पांच्या प्रगतीबाबत अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेऊन कामांचा दर्जा आणि गती समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयात नव्याने बसविण्यात आलेल्या डायलिसिस मशीनचे लोकार्पण खासदार तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या अत्याधुनिक सुविधेमुळे परिसरातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून आरोग्य सेवेत महत्त्वाची भर पडली आहे.श्रीवर्धन तालुक्यात विकासकामांची चांगली गती कायम असून भविष्यातही अशाच प्रकारे विकासाचा वेग वाढविण्याचा निर्धार खासदार तटकरे यांनी व्यक्त केला. तसेच तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असे ठाम आश्वासन त्यांनी यावेळी दिले.सदर पाहणी दौऱ्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चे श्रीवर्धन तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस कोठडीतील आरोपींसाठी आता गणवेश

**मुंबई :** मुंबई पोलिसांनी कोठडीत असलेल्या आरोपींच्या सुरक्षिततेसाठी आणि अनुचित प्रकार रोखण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शहरातील जनरल लॉकअपमध्ये असलेल्या आरोपींसाठी आता मुंबई पोलिसांनी अधिकृत गणवेश लागू केला असून, सर्व आरोपींना आता या ठराविक पेहरावात राहावे लागणार आहे.या नवीन नियमानुसार, पोलीस कोठडीत असलेल्या पुरुष संशयितांना मरून रंगाचे टी-शर्ट आणि हाफ पँट दिली जात आहे. आरोपीला अटक केल्यापासून ते त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत होईपर्यंत किंवा त्याची जामिनावर मुक्तता होईपर्यंत त्याला हाच गणवेश घालणे बंधनकारक असेल.पोलिसांनी प्रामुख्याने आरोपींच्या सुरक्षेसाठी हा उपक्रम राबवल्याचे सूत्रांनी सांगितले. यापूर्वी कोठडीत असताना स्वतःचे शर्ट, पँट, नाडी किंवा बेल्टचा वापर करून आरोपींनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या किंवा आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. आरोपी मानसिक तणावाखाली टोकाचे पाऊल उचलतात, त्यामुळे अशा गणवेशामुळे अशा घटना रोखण्यास मदत होईल, असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

## पत्रकार दत्ता खंदारे यांना पद्मश्री डॉ.मणीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार तसेच "निर्भीड जागल्या"पुरस्कार घोषित!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :(प्रतिनिधी)** : निती आयोग भारत सरकार,मिनिस्ट्री ऑफ एमएसएमई उद्यम मंत्रालय,भारत सरकार संलग्नित पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार तसेच मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई यांचा "निर्भीड जागल्या "पुरस्कार साप्ताहिक भगवे वादळचे संपादक,पत्रकार श्री दत्ता श्रावण खंदारे यांना घोषित करण्यात आला आहे.पत्रकारिता,शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील आदर्श रचनात्मक कार्याचा व भरीव योगदानाचा गौरव म्हणून पत्रकार दत्ता खंदारे यांना पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार २०२६, पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई प्रतिष्ठान निती आयोग,क्रीडा मंत्रालय राष्ट्रसेवा समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने घोषित करण्यात आला आहे.सदर पुरस्कार दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह, एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे येथे पुरस्कार प्रदान करण्यात येण्यात आहे तर "निर्भीड जागल्या"पुरस्कार १मे रोजी दादर येथील मामा काणेकर सभागृह मध्ये मान्यवर व्यक्तीच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



पत्रकार दत्ता खंदारे हे गेल्या ३०वर्षांपासून विविध साप्ताहिक आणि दैनिकामधून लिखाण करित असून स्वतःचे साप्ताहिक भगवे वादळ हे पत्रक मुबंईतून प्रसिद्ध करीत आहेत.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे डिजिटल पाऊल; लाभार्थ्यांना आता थेट मोबाईलवरून सेवा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव वाडी**

**नागपूर** : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी डिजिटल सेवेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. महामंडळाने अण्णासाहेब पाटील महामंडळ ॲप (Annasaheb Patil Mahamandal App) सुरू केले आहे. या ॲपच्या माध्यमातून महामंडळाच्या विविध योजनांची संपूर्ण प्रक्रिया आता थेट मोबाईलवरून करता येणार असून लाभार्थ्यांना अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक सेवा मिळणार आहे.

महामंडळाच्या सध्याच्या कार्यान्वित योजनांसाठी www.udyog.mahaswayam.gov.in हे संकेतस्थळ सध्या कार्यरत असून त्याद्वारे संपूर्ण कार्यपद्धती ऑनलाइन राबविण्यात येत आहे. मात्र, अनेक लाभार्थ्यांना संगणकाचा वापर करावा लागत असल्याने किंवा सायबर कॅफेचा आधार घ्यावा लागत असल्याने वेळ, खर्च आणि गैरसोयीचा सामना करावा लागत होता. काही प्रकरणांत एजंटमार्फत फसवणुकीच्या घटनाही निदर्शनास आल्याने लाभार्थ्यांना अधिक सुरक्षित आणि थेट सेवा देण्याची गरज निर्माण झाली होती. यावर उपाय म्हणून महामंडळाने वापरकर्ता-अनुकूल मोबाईल ॲप विकसित केले आहे.

हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून लाभार्थ्यांनी आपल्या अँड्रॉईड मोबाईलवर ते डाउनलोड करून वापर सुरू करावा, असे आवाहन महामंडळाने केले आहे. नव्या वापरकर्त्यांना मोबाईल क्रमांक, नाव आणि ई-मेल नोंदवून ओटीपीद्वारे नोंदणी पूर्ण करता येईल. यापूर्वी नोंदणीकृत असलेले लाभार्थी आपल्या लॉगीन आयडी आणि पासवर्डद्वारे थेट प्रवेश करू शकतील. महामंडळाच्या योजनांमध्ये लेटर ऑफ इंटेन्ट (LOI), सॅन्क्शन (Sanction) आणि क्लेम (Claim) असे तीन टप्पे असून आवश्यक कागदपत्रे ॲपवर अपलोड करण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे. तसेच अर्जाची स्थिती तपासणे, अद्ययावत माहिती मिळवणे आणि पुढील कार्यवाही करणे, या सर्व सुविधा ॲपच्या माध्यमातून शक्य होणार आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान, सुलभ आणि पारदर्शक होणार असून लाभार्थ्यांचा वेळ व खर्च वाचणार आहे.

सध्या क्लेम सादर करणाऱ्या आणि नव्याने मंजूर झालेल्या लाभार्थ्यांसाठी व्यवसायाचे जिओटॅग केलेले छायाचित्र अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या छायाचित्रांची पडताळणी जिल्हा समन्वयकांकडून केली जाणार असून त्यामुळे व्यवसाय प्रत्यक्ष सुरू असल्याची खात्री होईल आणि योजनांमध्ये पारदर्शकता अधिक बळकट होईल. यामध्ये जिओ-टॅगिंग व जिओ-फेन्सिंग प्रणालीचा वापर करण्यात येणार असून, गुगल नकाशाच्या सहाय्याने व्यवसाय पाहणीचे नियोजन केले जाईल. तसेच, ही माहिती महामंडळाच्या EHRMS प्रणालीशी संलग्न करण्यात येणार असून पुढील टप्प्यात ही सुविधा मोबाईल ॲपमध्येही उपलब्ध होणार आहे.

संगणक प्रणालीतील सर्व सुविधा मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर हे ॲप डाउनलोड करून त्याचा वापर करावा व या डिजिटल उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या डिजिटल प्रशासनाच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा मानला जात असून आर्थिकदृष्ट्या मागास घटकांपर्यंत शासकीय योजना अधिक परिणामकारकपणे पोहोचविण्यास यामुळे मदत होणार आहे.

## महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ग्यानचंद जांभूळकर यांची प्रभावी व मार्गदर्शक भाषणे

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे /भंडारा :** महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा उपाध्यक्ष (अंधश्रद्धा निर्मूलन समिती) ग्यानचंद ताराचंद जांभूळकर यांनी भंडारा जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रेरणादायी व प्रबोधनपर भाषणे दिली.

१३ ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत समाजकल्याण कार्यालय भंडारा, गुंजेपार बौद्ध विहार, आमगाव-दिघोरी येथील अनाथ आश्रम, चांदनी चौक, जे. एम. पटेल महाविद्यालय तसेच यशोदा नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक ठिकाणी स्थानिक मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम उत्साहात पार पडले.



आपल्या भाषणात जांभूळकर यांनी गौतम बुद्ध यांच्या करुणा व तत्त्वज्ञानाचा उल्लेख करत मानवी दुःख आणि त्यावरील उपाय यावर प्रकाश टाकला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, संत गाडगे महाराज आदी महापुरुषांच्या कार्याचा गौरव करत समाजाला समानता, शिक्षण व स्वाभिमानाचा संदेश दिला.महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची क्रांती घडवून आणली आणि समाजातील वंचित घटकांना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला, तर डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुतेची मूल्ये रुजवली, असे त्यांनी अधोरेखित केले. तसेच "शिक्षण हाच खरा परिवर्तनाचा मार्ग आहे" असा ठाम संदेश त्यांनी दिला.जांभूळकर यांनी महापुरुषांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन करत, समाजाने अंधश्रद्धा, अन्याय व भेदभाव यांना दूर ठेवून प्रगतिशील विचार स्वीकारावेत, असे सांगितले. त्यांच्या ओजस्वी व अभ्यासपूर्ण भाषणामुळे सर्वच कार्यक्रमांना मोठी उपस्थिती लाभली व वातावरण प्रेरणादायी झाले.कार्यक्रमांच्या शेवटी उपस्थितांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा कामथे यांना लाभ

### भारतीय स्टेट बँक अधिकारी वर्गाच्या पाठपुरावा यश

**दैनिक युवक आधार**

**नांदगाव खंडेश्वर/प्रदिप रघुते :** प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना केंद्र सरकारची एक उत्तम सामाजिक सुरक्षा योजना याद्वारे वार्षिक 436 सदस्यावरून दोन लाखांचे जीवन विमा संरक्षण मिळते त्यामुळे भारतीय स्टेट बँक धामक शाखाची मोर्चा वतीने पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेत सहभागी बँकेच्या खातेदार संजय किसान कामठे येवती यांचा अपघाती मृत्यू दिनांक 26 12 2025 रोजी अपघाती निधन झाले त्यांच्या कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळल्यामुळे त्यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा अंतर्गत विमा



काढलेला होता भारतीय टेस्ट बँक शाखा धामक शाखा अधिकारी यांनी त्यांच्या कागदपत्राची पूर्तता करून वरिष्ठांकडे अहवाल पाठविला व तो मंजूर करून आला त्यांच्या वारसाला दिनांक 30 3 2016 रोजी देण्यात आला त्यावेळी शाखा अधिकारी रामेश्वर काळकर वरिष्ठ सहाय्यक धीरज ठाकरे,पवन गिरुळकर, राहुल इंगोले उपस्थित होते

## ९५% गुणांसह रौनक भगतचा झंझावाती यश: मोंटफोर्ट चे नागपूरमध्ये गुणवत्ता यादीत ५वे स्थान

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे**
**विदर्भ संपादिका** : सीबीएसई दहावी बोर्ड परीक्षेत रौनक सुभाष भगत याने तब्बल ९५ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून मोंटफोर्ट शाळा, नागपूरच्या गुणवत्ता यादीत ५वे स्थान पटकावले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर रौनकने हे यश मिळवले आहे.



रौनकने दिल्ली येथील एज्युकेटरच्या ऑनलाइन मार्गदर्शनाचा लाभ घेत अभ्यास केला. नियमित सराव, वेळेचे नियोजन आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर यामुळे त्याला उत्कृष्ट यश मिळवता आले. त्याच्या या कामगिरीमुळे कुटुंबासह शाळेचेही नाव उज्ज्वल झाले आहे.रौनकचे वडील सुभाष भगत हे खाजगी व्यवसायात कार्यरत असून आई सुनीता भगत या वीज कंपनीत सेवा बजावत आहेत. कुटुंबाकडून मिळालेल्या प्रोत्साहनामुळे आणि शैक्षणिक वातावरणामुळे रौनकच्या यशाला बळ मिळाले.

बहुजन सौरभचे प्रख्यात लेखक डॉ. सुनील भगत आणि देवयानी भगत यांनी रौनकचे कौतुक करत त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.भविष्यात आयआयटीमध्ये प्रवेश घेऊन अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करण्याचा मानस रौनकने व्यक्त केला आहे. आपल्या यशाचे श्रेय त्याने आई-वडील, कुटुंबीय संजय भगत, मंजुषा भगत तसेच मोंटफोर्ट शाळेतील सर्व शिक्षकांना दिले आहे.रौनकच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ब्राम्हणवाडा गोविंदपुरात वंचित बहुजन आघाडीची दमदार एन्ट्री; शाखा फलकाचे जल्लोषात उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे**
**विदर्भ संपादिका** : अमरावती तालुक्यातील ब्राम्हणवाडा गोविंदपुर येथे दि. २२ एप्रिल २०२६ रोजी वंचित बहुजन आघाडी शाखेच्या फलकाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. राहुल भाऊ मेश्राम (जिल्हाध्यक्ष, अमरावती पूर्व) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून मा. नंदकुमार खंडारे (जिल्हा उपाध्यक्ष) प्रमुख उपस्थित होते.



या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी वंचित बहुजन आघाडीच्या विचारसरणीचा प्रसार करत संघटन अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागात सामाजिक न्याय, समानता आणि विकासाच्या मुद्द्यांवर ठाम भूमिका घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास राहुल भाऊ भालेराव, करण जाधव (शहर सचिव), निलेश वरघट, राजू भाऊ तंत्रपाळे, अमोल जवजाळ, यादव भाऊ गणवीर आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

शाखेच्या नव्या पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्ष प्रफुल्ल मोहोळ, उपाध्यक्ष राजरत्न धाकडे यांच्यासह धर्मेंद्र तायडे, मनोज वाघमारे, संजय प्रतेकी, अभिजित मेश्राम, स्वप्निल भलावी, अक्षय इंगळे, जनार्दन मोहोळ, पंकज कांबळे, प्रशांत बावनकर, विनोद सुरपान, सचिन तायडे, आकाश काळे, सतीश हिवराळे, सागर वाघमारे, प्रविण वाघमारे, प्रल्हाद मोहोड, लखन मोहोळ, संजय तायडे, चंदन ऊके आदी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

या उद्घाटन सोहळ्यामुळे ब्राम्हणवाडा गोविंदपुर परिसरात वंचित बहुजन आघाडीच्या संघटनात्मक कार्याला नवी दिशा मिळणार असून, स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद अधिक वाढणार असल्याचे चित्र आहे.

# बारावीनंतरचा करिअर निवड: एकाच चौकटीत अडकलेलं भविष्य?

आजचा काळ संधींचा आहे, पण दुर्दैवाने विचार मात्र अजूनही मर्यादित आहेत. बारावी झाल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी करिअरचे अनेक पर्याय खुले असतानाही समाजात एक ठराविक मानसिकता दिसून येते. इंजिनिअरिंग किंवा नर्सिंग हाच यशाचा मार्ग ही धारणा इतकी पक्की झाली आहे की अनेक पालक आणि विद्यार्थी इतर सर्व पर्यायांकडे दुर्लक्ष करतात. परिणामी, अनेक तरुण त्यांच्या खऱ्या क्षमतेपासून दूर जातात आणि आयुष्यभर एक असमाधानी प्रवास करतात. "सगळे करतात, म्हणून आपणही" करायचं ही धोकादायक मानसिकता आहे.

आज करिअर निवड ही आवड आणि क्षमतेवर आधारित न राहता, ट्रेंड आणि समाजाच्या अपेक्षा यावर आधारित होत चालली आहे.

"शेजाऱ्याचा मुलगा इंजिनिअर झाला", "नातेवाईकांची मुलगी नर्सिंग करते"अशा तुलना करून पालक आपल्या मुलांवर निर्णय लादतात.

ही मानसिकता तीन मोठे दुष्परिणाम निर्माण करते.

१)मुलांच्या स्वतंत्र विचारशक्तीचा अभाव

२) अभ्यासात उत्साह कमी होणे

पुढे जाऊन नोकरीत असमाधान आणि तणाव

प्रत्येक मुलगा 'एकसारखा' नसतो

शिक्षण म्हणजे केवळ गुणपत्रिका नव्हे, तर व्यक्तिमत्वाचा विकास आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारची बुद्धिमत्ता असते. कोणाला विश्लेषणात्मक विचार आवडतो, कोणाला सर्जनशीलता, तर कोणाला नेतृत्व किंवा संवाद कौशल्य. एखाद्या मुलाला चित्रकलेत गती असेल, तर त्याला जबरदस्तीने इंजिनिअर बनवणं म्हणजे त्याच्या नैसर्गिक गुणांची हत्या करणे होय. एखाद्या मुलाला लोकांशी संवाद साधायला आवडत असेल, तर तो उत्तम पत्रकार, वकील किंवा उद्योजक बनू शकतो.

आजच्या डिजिटल आणि जागतिक युगात करिअरच्या संधी अमर्याद आहेत. काही महत्त्वाचे क्षेत्र खालीलप्रमाणे

**१) स्पर्धा परीक्षा आणि प्रशासन**

UPSC, MPSC सारख्या परीक्षांद्वारे प्रशासनात जाऊन समाजात बदल घडवता येतो.

**२) डिजिटल आणि क्रिएटिव्ह क्षेत्र**

ग्राफिक डिझाईन, व्हिडिओ एडिटिंग, ॲनिमेशन, डिजिटल मार्केटिंग आज लाखो रुपयांची कमाई करणारे तरुण या क्षेत्रात आहेत.

**३) कृषी आणि ॲग्री-बिझनेस**

आधुनिक शेती, ऑर्गेनिक फार्मिंग, ॲग्री स्टार्टअप—ग्रामीण भागातही मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

**४)उद्योजकता**

नोकरीच्या मागे धावण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय सुरू करून इतरांना रोजगार देण्याची ताकद आजच्या तरुणांमध्ये आहे.

**५) कायदा आणि न्याय**

वकील, न्यायाधीश, लीगल ॲडव्हायझर—या क्षेत्रातही प्रतिष्ठा आणि स्थैर्य आहे.

**६) आरोग्य आणि नैसर्गिक उपचार**

आयुर्वेद, योग, नॅचरोपॅथी—आज लोक पुन्हा नैसर्गिक जीवनशैलीकडे वळत आहेत.

**७) सेवा आणि पर्यटन क्षेत्र**

हॉटेल मॅनेजमेंट, ट्रॅव्हल, इव्हेंट मॅनेजमेंट—जगभर फिरण्याची आणि कमाईची संधी.

**८) क्रीडा आणि फिटनेस**

खेळाडू, ट्रेनर, फिटनेस कोच—आज या क्षेत्रातही करिअर घडवता येतं.

आजच्या काळात बारावीनंतर फक्त इंजिनिअरिंग किंवा मेडिकल हेच पर्याय आहेत, असा गैरसमज अनेक पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये दिसून येतो. प्रत्यक्षात मात्र करिअरचे क्षेत्र खूप विस्तृत झाले असून, प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार वेगवेगळे मार्ग उपलब्ध आहेत. योग्य माहिती आणि मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी आपल्या आयुष्यात यशस्वी आणि समाधानी होऊ शकतो.

**विज्ञान शाखा**

विज्ञान शाखेतून विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि संशोधन अशा क्षेत्रात पुढे जाऊ शकतात.

**वैद्यकीय क्षेत्र**

वैद्यकीय क्षेत्रात जाण्यासाठी NEET ही सर्वात महत्त्वाची परीक्षा आहे. MBBS, BDS, BAMS, BHMS यांसारख्या अभ्यासक्रमांसाठी ही परीक्षा आवश्यक असते. आजही डॉक्टर हा समाजातील सर्वात प्रतिष्ठित व्यवसाय मानला जातो.

**अभियांत्रिकी क्षेत्र**

अभियांत्रिकीसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत:

JEE Main व JEE Advanced – IIT आणि NIT मध्ये प्रवेशासाठी

MHT CET – महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी

BITSAT, VITEEE, SRM-JEEE – खाजगी विद्यापीठांसाठी

**संशोधन क्षेत्र**

ज्यांना विज्ञानात खोलवर अभ्यास करायचा आहे त्यांच्यासाठी:

IISER Aptitude Test (IAT)NESTहे पर्याय उत्तम संशोधक बनण्यासाठी मदत करतात.

**संरक्षण क्षेत्र**

देशसेवा करण्याची इच्छा असल्यास NDA Exam

वाणिज्य शाखा वाणिज्य शाखेतही मोठ्या प्रमाणात करिअर संधी आहेत:

CA – आर्थिक तज्ज्ञ बनण्यासाठीCS – कंपनी कायद्याचे तज्ज्ञCMA – खर्च व्यवस्थापन तज्ज्ञ CUET – केंद्रीय विद्यापीठांमध्ये प्रवेशIPMAT – IIM मध्ये मॅनेजमेंट शिक्षणSET, NPAT कला, कायदा आणि डिझाईन (Arts / Law / Design)

**कला शाखेतूनही उत्कृष्ट करिअर घडू शकते:**

- कायदा (Law)
- CLAT
- आयलेट
- डिझाईन आणि आर्किटेक्चर
- NATA
- NID DAT
- UCEED

आता पालकांनी भूमिका बदलण्याची गरज आहे.

पालक हे मुलांच्या आयुष्यातील पहिले मार्गदर्शक असतात. त्यामुळे त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांवर निर्णय लादण्याऐवजी त्यांना समजून घ्या त्यांच्या आवडी-निवडी ओळखा.

करिअर काउन्सेलिंगचा आधार घ्या

अपयश आलं तरी त्यांना साथ द्या

लक्षात ठेवा, दबावाखाली घेतलेला निर्णय कधीच दीर्घकालीन आनंद देत नाही.

शिक्षणाचा खरा अर्थ

शिक्षण म्हणजे फक्त पदवी मिळवणं नव्हे, तर स्वतःची ओळख निर्माण करणं आहे. जर एखादा विद्यार्थी आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करत असेल, तर तो केवळ यशस्वीच नव्हे तर आनंदीही राहतो. मार्ग दाखवू नका, मार्ग शोधू द्या. इंजिनिअरिंग किंवा नर्सिंग हे चुकीचे नाहीत, पण तेच एकमेव पर्याय आहेत, हा विचार चुकीचा आहे. प्रत्येक मुलामध्ये एक वेगळी ताकद असते—ती ओळखून योग्य दिशा दिली, तर तो कुठल्याही क्षेत्रात चमकू शकतो.मुलांना ठराविक चौकटीत अडकवू नका

त्यांना स्वप्न पाहू द्या, प्रयोग करू द्या.कारण…"यशाचा खरा मार्ग तोच असतो, जो मनाला आवडतो."



**लेखक**
**स्वप्नील भोवते**
**समुपदेशक, उद्योजक**
**मो. 9372127769**

# स्थानिक गीताबाई पोटे विद्यामंदिर येथे वसुंधरा दिन साजरा !!



**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : स्थानिक गीताबाई पोटे विद्या मंदिर अकोट येथे धारिणी फॉउंडेशन च्या वतीने वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. पृथ्वी म्हणजे आपली माता तिचे रक्षण करणे आपली कर्तव्य व जबाबदारी आहे.

पृथ्वी वरील वाढते तापमान, वाढता कचरा, अनावश्यक प्लास्टिक वस्तूंचा अतिवापरामुळे हवा, पाणी प्रदूषण वाढलेले आहे,

वृक्ष म्हणजे आपले जीवन, श्वास आहे.. जास्तीत जास्त वृक्ष लावून संवर्धन केले तर आपल्याला चांगले आरोग्य, जीवन मिळेल. या संकल्पनेतून धारिणी फॉउंडेशन कार्य करीत आहे.. सुरवातीला शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले नंतर ओला सुका कचरा मोठा खड्डा करून त्यात टाकण्या साठी शाळेच्या परिसरात सुरुवात करण्यात आली.भाऊसाहेब पोटे शिक्षण संस्थेच्या सचिव प्रा.डॉ. मेघना पोटे यांनी धारिणी संस्था ही वसुंधरा संवर्धन साठी स्तुत्य असे कार्य करीत असून ही काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले.वसुंधरा दिना निमित्य वृक्ष रोपण,कार्यक्रम खूप छान पार पडला . कार्यक्रमात संस्थेच्या सचिव डॉ.मेघना पोटे, डॉ.मनीषा मते, शाळेच्या मुख्याध्यापिका गावंडे मॅडम , शिक्षक वर्ग व विध्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाला धारिणी फॉउंडेशन च्या उपाधक्षा लताताई चिकटे,सदस्या अर्चना काळे,संजीवनी कविटकर,वर्षा मानकर,भारती काटोले, अर्चना सावरकर, वैशाली, बाभुळकर, माकोडे मॅडम, प्रीती पाथ्रीकर दीपिका लबडे, दुर्गा उदगीरकर, पाचूरकर, व शाळेतील विध्यार्थी चा सहभाग लाभला.विध्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# भगतसाहेबांच्या पुण्यतिथी निमित्त समाजोपयोगी कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८ व्या पुण्यतिथी निमित्ताने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार २०२६ स्पर्धा, "श्रीमंत योगी" महानाट्य, त्याचबरोबरीने नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर, सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य त्याचबरोबरीने उरण उपनगराध्यक्ष यांचा सत्कार सोहळा अशी विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे



आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांची नियोजन बैठक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उलवे नोडमध्ये पार पडली.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या या बैठकीस प्रमुख मान्यवर म्हणून माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, संस्थेचे संचालक अनिल भगत, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, भाऊशेठ पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, पनवेल महापालिकेचे गटनेते प्रकाश बिनेदार, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, वसंतशेठ पाटील, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, प्रकाश भगत, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, अजय भगत, विश्वनाथ कोळी, विजय घरत, जितेंद्र म्हात्रे, स्वप्नील ठाकूर, जयवंत देशमुख, ॲड. राहुल घरत, सी. एल. ठाकूर, अनिल देशमुख, नाना देशमुख, व्ही. के. ठाकूर, पी.के.ठाकूर, यांच्यासह जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे पदाधिकारी व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्याचबरोबर देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत त्यांनी समाजाला न्याय दिला आहे. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार या वर्षीही देण्यात येणार आहे. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींचे स्वच्छतेच्या निकषावर सर्वेक्षण करण्यात येत आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना ०७ मे रोजी उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे होणाऱ्या पुण्यतिथी कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबरीने "श्रीमंत योगी" महानाट्य", तसेच नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळा या आयोजित कार्यक्रमाचा नियोजन आढावा घेण्यात आला.

# खत-बियाण्यांच्या चढ्या दराने विक्रीवर कारवाई करा; आमदार अब्दुल सत्तार यांचे प्रशासनाला निर्देश

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख सिल्लोड:-** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने प्रमाणित बियाणे व खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा, खतांची कोणतीही टंचाई निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि चढ्या दराने खत-बियाण्यांची विक्री करणाऱ्या तसेच बोगस साहित्य विकणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर कडक कारवाई करण्यासाठी तातडीने 'टास्क फोर्स' स्थापन करावा, असे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले. येथील नगर परिषद सभागृहात खरीप हंगाम पूर्व तालुकास्तरीय नियोजन व आढावा बैठकीत ते बोलत होते.

बैठकीत पीक कर्ज वाटपावर भर देताना आमदार सत्तार यांनी बँकांना सक्त ताकीद दिली की, पात्र शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांची कोठेही



अडवणूक होणार नाही, याची गांभीर्याने दखल घ्यावी. अतिवृष्टी व दुष्काळसदृश परिस्थितीसाठी पर्यायी पिकांचा आराखडा तयार ठेवण्यासोबतच नॅनो युरियाचा वापर आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर त्यांनी भर दिला. कृषी सहाय्यकांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांना सरकारी योजनांची माहिती द्यावी, असेही त्यांनी सुचवले. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' आणि 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' योजनेची कामे तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश देत, सर्व विभागांनी सात दिवसांत कृती आराखडा सादर करावा, असेही त्यांनी बजावले. शेतकऱ्यांनी खरेदी करताना अधिकृत पावती घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीत नगराध्यक्ष अब्दुल समीर, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार अंकिता ताकभाते, उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, मुख्याधिकारी कारभारी दिवेकर आणि पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

तसेच जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, सभापती विश्वास दाभाडे, उपसभापती संदीप राऊत, जि.प. सदस्य देविदास पालोदकर, शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे, माजी सभापती रामदास पालोदकर, माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, नॅशनल सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन नरेंद्र (बापू) पाटील, संचालक राजेंद्र ठोंबरे, सतीश ताठे, जयराम चिंचपुरे, नानासाहेब रहाटे, भावराव पा. लोखंडे, शंकरराव खांडवे, सयाजीराव वाघ, संजय डमाळे, दुर्गाबाई पवार, सुदर्शन अग्रवाल, मनोज झंवर, पं.स. सदस्य शेख सलीम, समी चाउस, जलसंधारण अधिकारी राजधर दांडगे, उपविभागीय अभियंता रुचिका घोगरे, अभय शेळके, न.प. गटनेता सुधाकर पाटील, नगरसेवक सिद्धेश्वर आहेर, आसिफ बागवान, शेख इम्रान, अशोक बनसोड, सत्तार हुसेन, शेख सलीम हुसेन यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वांगणसुळे – खोबळा बंधाऱ्याबाबत प्रशासनाची लेखी हमी मिळाली

## लेखी आश्वासन मिळाल्याने ग्रामस्थ समाधानी

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : वांगण सुळे व खोबळा परिसरातील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या आंदोलनाला आज निर्णायक वळण मिळाले. जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी ग्रामस्थांच्या मागण्यांवर प्रशासनाने लेखी स्वरूपात हमी दिल्याने आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

तहसील कार्यालय, सुरगाणा येथे माजी आमदार जे. पी. गावित यांच्या उपस्थितीत जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. या बैठकीस उपविभागीय जलसंधारण अधिकारी राही झुरावत (मृद व जलसंधारण उपविभाग, सुरगाणा) व जलसंधारण अधिकारी गौरव पवार उपस्थित होते.बैठकीनंतर अधिकाऱ्यांनी लेखी पत्राद्वारे स्पष्ट केले की, वांगणसुळे व खोबळा येथील बंधाऱ्यांच्या दुरुस्ती व संबंधित कामांसाठी आवश्यक ती निविदा



प्रक्रिया राबवून लवकरात लवकर काम सुरू करण्यात येईल. प्रशासकीय मंजुरी व प्रक्रिया पूर्ण करून येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.ग्रामस्थांनी तोंडी आश्वासनांवर विश्वास न ठेवता लेखी हमीची मागणी केली होती.

प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.यावेळी माजी आमदार जे. पी. गावित, इंद्रजीत गावित, रामजी राठोड, वसंत बागूल, चंद्रकांत वाघेरे, युवराज गवळी, गोविंद धूम, तानाजी टोपले आदींच्या उपस्थितीत आंदोलनाला पूर्णविराम देण्यात आला.

# सणसर प्राथमिक शाळेच्या मैदानातील खड्डे विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतण्याची शक्यता

## ठेकेदाराच्या निष्काळजी पणाविरोधात पालकांचा संताप"

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सणसर येथील मैदानात मागील पंधरा दिवसांपासून संरक्षक भिंतीचे काम करण्यासाठी शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ कॉलम उभे करण्यासाठी मोठे खड्डे खणून ठेवले आहेत.या खड्ड्यांमुळे शाळेत येणाऱ्या लहान विद्यार्थ्यांना रोज मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे खोदून ठेवलेल्या खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांचा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शाळेत जाण्या-येण्याच्या मार्गावर अडथळा निर्माण झाल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.गावातील जेष्ठ नागरिक व महिला ओपन जिममध्ये व्यायाम करण्यासाठी जाताना या खड्ड्यांमुळे मोठी कसरत करावी लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. शाळेच्या परिसरात सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून,लहान मुलांच्या जीवितास धोका



निर्माण होण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायतीने संबंधित ठेकेदारांना योग्य सूचना करून तातडीने काम सुरू करावे,अन्यथा हे खड्डे बुजवून जैसे थे स्थिती करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना रोज त्रास सहन करावा लागत आहे.यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून,प्रशासन आणि ठेकेदाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# विदर्भ राज्याच्या मागणीला शैक्षणिक बळ; “चला विदर्भ जाणून घेऊ या” अभियानातून शिक्षकांशी थेट संवाद

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : विदर्भ राज्याच्या मागणीला व्यापक जनसमर्थन मिळवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या “चला विदर्भ जाणून घेऊ या” या अभियानाला शैक्षणिक क्षेत्रातूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या प्रदेशाध्यक्ष श्रीमती रंजनाताई मामर्डे व कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्माताई राजपूत यांच्या नेतृत्वात परतवाडा तहसील परिक्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांना भेट देत प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला.

या संवाद मोहिमेत शैक्षणिक क्षेत्रातील उदयोन्मुख नेतृत्व डॉ. प्रशांत विघे यांच्यासह पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराज सिंह राजपूत, प्रा.



डॉ. रमेश बडगे, प्रा. डॉ. सतीश भागवत, प्रा. अंकुश कडू व मयूर देव्हाते यांनी सक्रिय सहभाग घेतला.

२३ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या या उपक्रमात खालील शैक्षणिक संस्थांना भेटी देण्यात आल्या –

जनता हायस्कूल, परसापूर येथे प्राचार्य चंद्रशेखर गुलवाडे यांच्या उपस्थितीत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांशी सखोल चर्चा करण्यात आली.सिद्धार्थ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, परतवाडा येथे प्राचार्य मोहोड यांच्या नेतृत्वाखालील शिक्षकवर्गाशी संवाद साधण्यात आला.

सुबोध हायस्कूल व सब लेफ्टनंट विवेक पिंपळीकर कनिष्ठ महाविद्यालय, परतवाडा येथे प्राचार्य संजय चौबे यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभियानास सकारात्मक प्रतिसाद दिला.

या भेटीदरम्यान विदर्भ राज्य निर्मितीची गरज, स्थानिक विकास, शैक्षणिक संधी, रोजगारनिर्मिती व प्रादेशिक असमतोल या विषयांवर सखोल चर्चा झाली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

अभियानाच्या माध्यमातून विदर्भाच्या प्रश्नांवर जनजागृती करताना शैक्षणिक क्षेत्राचा सक्रिय सहभाग हा आंदोलनाला नवे बळ देणारा ठरत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.या अभियानातील क्षणचित्रांनी विदर्भाच्या हक्काच्या लढ्याला नवी ऊर्जा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# माहितीच्या अधिकारालाच हरताळ? रायगड शिक्षण विभागाकडून अपूर्ण माहिती देण्याचा प्रकार

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर पनवेल | प्रतिनिधी** : माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत मागवलेल्या माहितीसंदर्भात रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दिलेल्या उत्तरामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अर्जदाराने 2024-25 व 2025-26 या कालावधीतील प्राथमिक शिक्षण विभागातील मंजूर व कार्यरत शिक्षकांची संख्या तसेच शाळांना दिलेल्या निधीची सविस्तर माहिती मागितली होती.मात्र, संबंधित विभागाने 2025-26 या वर्षाची माहिती अद्याप पूर्ण नसल्याचे कारण देत ती देण्यास नकार दिला आहे.

त्यामुळे माहिती देण्याऐवजी टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप होत आहे.विशेष म्हणजे, माहितीचा अधिकार कायद्यानुसार उपलब्ध असलेली माहिती निश्चित कालावधीत देणे बंधनकारक असताना, अपूर्ण कामाचा दाखला देत माहिती नाकारणे हे कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासणारे आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, शिक्षण विभागाच्या कामकाजातील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी अपूर्ण माहितीचा आधार घेत अर्ज निकाली काढल्याने माहिती अधिकार कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. आता याप्रकरणी उच्च अधिकाऱ्यांकडे दाद मागितली जाण्याची शक्यता असून, अपील दाखल करण्याची तयारी अर्जदार करत आहे

# देगलूर महावितरणाच्या नविन विभागीय कार्यालयासाठी एक कोटी सव्वीस लाख रुपयांची निधी मंजूर

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर (दि.२५) देगलूर महावितरण विभागाच्या विकासाला गती देणारा निर्णय अखेर साकार झाला असून महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी तब्बल एक कोटी सव्वीस लाख अठ्ठयाहत्तर हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.या निर्णयामुळे देगलूरसह परिसरातील वीज व्यवस्थापन अधिक सक्षम व कार्यक्षम होणार असल्याचे चित्र आहे.देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आ.जितेश अंतापूरकर यांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रस्तावाची तात्काळ दखल घेत निधी मंजूर केला आहे.नवीन विभागीय कार्यालयाच्या इमारतीमुळे महावितरणच्या कामकाजाला स्वतंत्र व सुसज्ज सुविधा मिळणार आहेत.यामुळे नागरिकांना वीजसंबंधित सेवा अधिक जलद आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होणार आहेत.तसेच,प्रशासनिक कार्यक्षमता वाढून तक्रार निवारण प्रक्रियेलाही गती मिळणार आहे. दरम्यान,मंजूर निधीच्या प्रक्रियेला लवकरच अंतिम स्वरूप दिले जाणार असून प्रत्यक्ष बांधकाम कामालाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती मिळाली आहे.या निर्णयामुळे देगलूरच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

**आ.अंतापूरकर यांचा डबल धमाका** : आरोग्य क्षेत्र माझ्या मतदारसंघात भक्कम उभारली पाहीजे सर्वसामान्य नागरीकांना आरोग्य सुविधा सुलभतेने मिळाली पाहीजे यासाठी अविरत पाठपुरावा करुन देगलूरच्या श्रेणीवर्धन दवाखाना बांधकामासाठी आ.जितेश अंतापूरकरांनी पाठपुरावा करुन भरीव निधी मंजूर करुन घेतली होती आता महावितरण विभागाचे विभागीय कार्यालय बांधकामासाठी निधी मंजूर करुन आणल्याने आ.जितेश अंतापूरकर यांच्या विकासप्रेम वृत्तीचे मतदारसंघात कौतूक होत आहे.

# शेतकरी कुटुंबातील प्रा. युवराज जांभूळकर यांना पीएच.डी. प्रदान

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे लाखनी तालुका प्रतिनिधी** : लाखांदूर तालुक्यातील चप्राड (सोनी ) या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातून आलेल्या एका जिद्दी तरुणाने आपल्या कष्ट, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. युवराज पुरुषोत्तम जांभूळकर यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीतर्फे पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.



अर्थशास्त्र विषयात स्नातकोत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी NET व SET सारख्या स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण करून संशोधन क्षेत्रात पाऊल टाकले. “गडचिरोली जिल्ह्यातील वनउपज क्षेत्रात काम करणाऱ्या आदिवासींच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन (२०११-१२ ते २०१९-२०)” या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सामाजिक दृष्ट्या संवेदनशील विषयावर त्यांनी सखोल संशोधन करून शोधनिबंध सादर केला. या संशोधनासाठी त्यांना प्राचार्य डॉ. एन. जी. उमाटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. जांभूळकर यांच्या संशोधनामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील आर्थिक वास्तवावर प्रकाश पडला असून, त्यांच्या कार्याची शैक्षणिक तसेच सामाजिक स्तरावर मोठ्या प्रमाणात दखल घेतली जात आहे.

सध्या ते समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबातून येत त्यांनी अर्थशास्त्रासारख्या कठीण विषयात पीएच.डी. प्राप्त केल्यामुळे त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.आपल्या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, पत्नी, भाऊ, मित्रपरिवार आणि सहकारी यांना दिले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्यासह सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. डॉ. युवराज जांभूळकर यांची ही प्रेरणादायी वाटचाल ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवा आदर्श ठरत आहे.

# महापुरुषांच्या विचारातून राष्ट्र उभारणीचा संकल्प; नागपूर महावितरणतर्फे 'संयुक्त जयंती' व 'रक्तदान' संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा वारसा जपत, महावितरण आणि महापारेषण नागपूर परिमंडळातील सर्व कामगार संघटनांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. 23) एका भव्य संयुक्त जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गड्डीगोदाम येथील महावितरण शहर मंडळाच्या 'प्रकाश भवन' कार्यालयाच्या प्रांगणात पार पडलेला हा सोहळा वैचारिक प्रबोधन आणि सामाजिक बांधीलकीचा एक अनोखा संगम ठरला.




**विचारांची सांगड ही काळाची गरज: डॉ. शैलेंद्र लेंडे**

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे उपस्थित होते. आपल्या ओघवत्या शैलीत उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले, "आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत राष्ट्राची उभारणी आणि सर्वांगीण विकासासाठी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची व विचारांची सांगड घालणे ही काळाची गरज आहे. या महापुरुषांचे विचार केवळ पुस्तकात नसून ते जगण्यात उतरवणे आवश्यक आहे."

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महापारेषण नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सतीश अणे होते. प्रमुख अतिथी म्हणून महावितरण नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे आणि नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. महावितरणचे कार्यकारी अभियंता हेमराज ढोके यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रगत विचारांनी आधुनिक भारताची पायाभरणी कशी केली, यावर प्रकाश टाकला.

**रक्तदानातून महापुरुषांना मानवंदना**

केवळ भाषणे न करता सामाजिक उत्तरदायित्व जपण्यासाठी महावितरणच्या नागपूर शहर मंडळातर्फे 'प्रकाश भवन' येथील लघु प्रशिक्षण केंद्रात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मानवतावादी उपक्रमाचे उद्घाटन सिव्हील लाईन्स विभागाचे कार्यकारी अभियंता धम्मदीप फुलझेले यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात सामाजिक ऊर्जेचा प्रत्यय आला, जेव्हा 25 पेक्षा अधिक वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून महापुरुषांच्या विचारांना कृतीची जोड दिली.

शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना अधीक्षक अभियंता अमित परांजपे यांनी रक्तदात्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, "रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे आणि अशा उपक्रमांमुळे समाजातील अत्यंत गरजू आणि गरीब रुग्णांना जीवदान मिळते." या शिबिरासाठी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने तांत्रिक सहकार्य केले.

या भव्य सोहळ्याला कार्यकारी अभियंता राहुल जिवतोडे, धम्मदीप फुलझेले, समीर टेकाडे, स्वप्निल गोतमारे यांच्यासह महावितरण व महापारेषणचे अनेक वरिष्ठ अधिकारी आणि अभियंता मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशांत शृंगारे यांनी केले, तर सूत्रसंचालन आनंद कांबळे यांनी प्रभावीपणे सांभाळले. शेवटी सुभाष मुळे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश अंबादे, आशिष सोमकुंवर, प्रमोद मेश्राम, अब्दुल सादिक, राजेश पोफळी, अमरदीप बागडे, नरेंद्र तिजारे, योगेश विटनकर, मनोज मेश्राम, संतोष हिरुळकर, रमेश वाटकर, कमलेश मांडवगडे आणि स्वाती फाटे यांसह सर्व कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी परिश्रम घेतले.

# समाज भवन, टाकळी सीम येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : टाकळी सीम येथील समाज भवनात सामाजिक समता सप्ताहानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम जयंती उत्सव समिती, टाकळी सीम व आंबेडकर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने झाली. हे वाचन मान. धर्मरक्षित टेंभुर्णे व मान. पद्माकर डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी एकसंघपणे संविधान मूल्यांची पुनःप्रतीज्ञा घेतली.

सांस्कृतिक कार्यक्रमात देवयानी भगत व सुषमा शेवडे यांनी “माझ्या भारत देशात” हे प्रेरणादायी गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. त्यानंतर त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित लघुनाटिका सादर करण्यात आली. या नाटिकेत शोभा गौतम पाटील यांनी रमाईंची भूमिका साकारली, तर इंजि. गौतम पाटील यांनी बाबासाहेबांच्या भूमिकेतून प्रभावी अभिनय सादर केला.

कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी अंधश्रद्धेविरोधात प्रबोधन करत बुवाबाबांच्या खोट्या चमत्कारांचे वास्तव उलगडले. चंदुलाल पाटील यांनी संविधान विषयावर मार्गदर्शन केले, तर देविदास रंगारी यांनी विवेकी जीवनशैलीचा संदेश दिला. मा. मदन मोटघरे यांनी बाबासाहेबांनी घडवलेल्या मानवतावादी परिवर्तनावर सखोल विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जॉली कराडे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले.या कार्यक्रमाला आंबेडकर सोसायटी परिसरातील ज्येष्ठ सभासद व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सचिन लोखंडे, अस्मिता तायडे, अमिता वंजारी, स्मिता तांबे, प्रणाली मांडवकर, पल्लवी बडगे, सोनम पाटील, सुलोचना ढोणे, रूपवती लोखंडे, समीक्षा ढोरे, सपना फडके, शीला मांडवकर, दक्षता बेलेकर, श्रेया हाडके, नंदा ओके, सुरेखा बडगे, पायल गवळी, श्वेता जांभूळकर, नलिनी वंजारी यांच्यासह शंभराहून अधिक नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमातून सामाजिक समता, विवेकवाद आणि संविधान मूल्यांची जागरूकता दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

# निविष्ठांची उपलब्धता ठेवा

## गैरप्रकार आढळल्यास कडक कारवाई करणार - जिल्हाधिकारी वर्षा मीना

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे/प्रतिनिधी :** खरीप हंगामात शेतकरी बांधवांना बियाणे, खते, कीटकनाशके यांची कमतरता भासू देऊ नये, तसेच बोगस बियाणे, खते, किटकनाशक यांची विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी येथे दिले.



खरीप पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा जिल्हाधिका-यांनी गुरुवारी बैठकीद्वारे घेतला. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे, कृषी उपसंचालक हरीश देशमुख, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद डॉ. तुषार जाधव आदी यावेळी उपस्थित होते.

बियाणे विक्रीत कुठेही गैरप्रकार घडता कामा नये. त्यासाठी कृषी भरारी पथके कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. बियाण्याची गुणवत्ता, बियाणे व इतर निविष्ठा उपलब्धता यादृष्टीने परिपूर्ण नियोजन व्हावे, असेही निर्देश त्यांनी दिले.

अकोला जिल्ह्यात खरीपासाठी २०२५ या वर्षात ४ लक्ष ३१ हजार ८८४ हे. क्षेत्र होते. आगामी हंगामासाठी प्रस्तावित क्षेत्र ४ लक्ष ३७ हजार १०० हे. आहे. येत्या खरीप हंगामासाठी ६५ हजार १०६ क्विंटल इतकी बियाण्याची संभाव्य मागणी आहे. त्याचप्रमाणे, कापूस पिकाचे संभाव्य क्षेत्रफळ १ लक्ष ४५ हजार हे. असेल. बी.टी. कापूस बियाण्याची संभाव्य मागणी ७ लक्ष २५ हजार पाकिटे आहे. सोयाबीन बियाणे १ लक्ष ७ हजार ४८२ क्विं. असे नियोजन आहे. खतांचा आज रोजीचा शिल्लक साठा ४१ हजार ९०५ मे. टन आहे. आवश्यकतेनुसार निविष्ठा जिल्ह्यात प्राप्त करून घेऊन कुठेही उणीव भासणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

# महेश सहकारी साखर कारखान्याची निवडणूक अविरोध!

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : आष्टी,पाटोदा, शिरूर का.मतदार संघासह शेजारील तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची 'कामधेनू' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महेश सहकारी साखर कारखान्याची संचालक मंडळाची निवडणूक अविरोध पार पडली आहे.या निवडणुकीत माजी आ.भीमराव धोंडे यांच्या समर्थकांनी आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत कारखान्याची सत्ता पुन्हा आपल्या ताब्यात ठेवली आहे. कारखान्यासारख्या



मोठ्या संस्थेची निवडणूक अविरोध पार पडणे ही संपूर्ण परिसरासाठी अत्यंत आनंदाची बाब मानली जात आहे.या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत आष्टी विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आ.भीमराव धोंडे,युवा नेते डॉ. अजयदादा धोंडे यांची महेश सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी अविरोध निवड झाली आहे. नवनिर्वाचित संचालक मंडळ खालीलप्रमाणेमाजी आ.भीमराव धोंडे आणि डॉ. अजयदादा धोंडे यांच्या नेतृत्वाखालील खालील संचालकांची कारखान्याच्या संचालक मंडळावर अविरोध निवड करण्यात आली आहे. नियामत बेग जगताप संभाजी, झगडे सतीश,ॲड. निकाळजे रत्नदीप,सांगळे गणेश, शिंदे केशव, चव्हाण झुंबर, कर्डिले बजरंग, गावडे गजानन,गर्जे शहादेव,विधाते उद्धव,जगताप दादासाहेब, खेडकर अशोक,मोहोळकर तुकाराम, मुंडे अंकुश,श्रीमती गोल्हार क्रांतीश्रीमती नन्नवरे उज्वला,वाघुले बाबासाहेब,दिंडे सदाशिव या सर्व नवनिर्वाचित संचालकांचे आष्टी, पाटोदा, शिरूर परिसरातील शेतकरी,सभासद व नागरिकांकडून अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्र रेल्वे परिषदेत कोकणातील रेल्वे प्रश्नांवर जोरदार चर्चा होणार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई किशोर गुडेकर, विभाग प्रतिनिधी प्रमुख** : अखंड कोकण रेल्वे प्रवासी सेवा समिती, महाराष्ट्र यांच्या वतीने २६ एप्रिल २०२६ रोजी “महाराष्ट्र रेल्वे परिषद” चे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजल्यापासून ही परिषद दादर पूर्व येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर सभागृहात (दुसरा मजला) पार पडणार आहे. राज्यातील रेल्वे प्रवाशांच्या विविध समस्या आणि प्रलंबित प्रश्नांवर या परिषदेत सविस्तर चर्चा होणार आहे.

या परिषदेचा मुख्य उद्देश “महाराष्ट्रातील मराठी जनतेवर रेल्वे संदर्भात होत असलेल्या अन्यायाकडे लक्ष वेधणे” हा आहे. विशेषतः कोरोना काळात बंद करण्यात आलेल्या काही गाड्या अद्याप सुरू न झाल्यामुळे प्रवाशांना होणारा त्रास, तसेच महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांचा फायदा इतर राज्यांकडे वळत असल्याचा मुद्दा परिषदेत मांडला जाणार आहे.

कोकणातील प्रवाशांच्या अडचणी हा या परिषदेचा केंद्रबिंदू राहणार असून, सावंतवाडी टर्मिनसचा प्रश्न प्राधान्याने मांडण्यात येणार आहे. सध्या कोकणातून धावणाऱ्या बहुतांश गाड्या गोव्यात संपत असल्यामुळे कोकणातील प्रवाशांना तिकीट मिळण्यात अडचणी येतात. गोव्यातील वाढत्या पर्यटनामुळे बाहेरील प्रवाशांची संख्या वाढल्याने स्थानिक कोकणी जनतेला रेल्वे प्रवास करताना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे समितीचे म्हणणे आहे. त्यामुळे सावंतवाडी येथे स्वतंत्र टर्मिनस उभारण्याची गरज असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याशिवाय दादर–रत्नागिरी पॅसेंजर, सह्याद्री एक्सप्रेस, तसेच हडपसर–नांदेड एक्सप्रेस यांसारख्या गाड्यांचे प्रश्न आणि सेवा सुधारणा यावरही चर्चा होणार आहे. या सर्व मुद्द्यांवर ठोस निर्णय घेऊन शासन व रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचा समितीचा मानस आहे.कोकणाच्या हक्कासाठी एकत्र येण्याचे आवाहन आयोजकांनी केले असून, जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# जि. प. शाळा मोहदरी येथे इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड** : मोहदरी येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत चांगल्या वातावरणात आणि उत्साहात पार पडला. प्राथमिक शिक्षणाचे टप्पे पूर्ण करून माध्यमिक शिक्षणाकडे पाऊल टाकणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी मान्यवरांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन मंदाडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक दादाराव चिरंगे सर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून धोबे सर, दिवसरकर सर व श्रीखंडे सर मंचावर उपस्थित होते.यावेळी निरोप घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळेतील आपल्या आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनी आपल्याला दिलेल्या संस्कारांमुळेच आम्ही आज इथपर्यंत पोहोचू शकलो, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. मुख्याध्यापक दादाराव चिरंगे सर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, "शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडवावे आणि शाळेचे नाव उज्ज्वल करावे." तसेच धोबे सर आणि श्रीखंडे सर, देवसरकर सर यांनीही विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी मोलाचे सल्ले देऊन त्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाला शाळेतील इतर शिक्षक वृंद, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. निरोप समारंभामुळे वातावरण काहीसे भारावलेले होते, मात्र नवीन स्वप्नांच्या जिद्दीने विद्यार्थी पुढील प्रवासासाठी सज्ज झाले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# घरातील किरकोळ अपघाताने पार्कीन्सनग्रस्त महिलेच्या पाठीचा कणा झाला फ्रॅक्चर; वेळीच उपचारांमुळे ती पुन्हा चालु लागली

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये प्रगत काइफोप्लास्टीमुळे ६८ वर्षीय रुग्णाला मिळाले नवे आयुष्य

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** घरात पडल्यामुळे पाठीच्या कण्याला गंभीर दुखापत झालेल्या ६८ वर्षीय महिलेला अत्याधुनिक आणि मिनिमली इन्व्हेसिव्ह 'काइफोप्लास्टी' उपचारामुळे केवळ काही दिवसांत पुर्ववत चालता येऊ लागले असून रुग्णाचा आत्मविश्वासही वाढला आहे. खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ. हरीश नाईक यांच्या नेतृत्वाखाली टीमने या रुग्णावर यशस्वी उपचार केले. रुग्णाला पूर्वीपासूनच उच्च रक्तदाब, इस्केमिक हार्ट डिसीज (पूर्वी स्टेंट बसविला होता), पार्किन्सन आजार आणि हायपोथायरॉईडीझम अशा अनेक आरोग्य समस्या होत्या. त्यामुळे हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे आणि आव्हानात्मत होते. मात्र वेळीच निदान आणि प्रगत उपचारांमुळे रुग्ण लवकर बरी झाली आणि पुन्हा हालचाल करू लागली.

खारघर येथे राहणाऱ्या श्रीमती मीना पवार (नाव बदलले आहे)** या पार्किन्सन आणि हायपोथायरॉईडीझमसारख्या दीर्घकालीन आजारांशी झुंज देत होत्या. या आजारांमुळे त्यांच्या शारीरीक ऊर्जेवर , संतुलनावर आणि दैनंदिन हालचालींवर परिणाम झाला होता. मात्र २३ फेब्रुवारी २०२६ रोजी घरातील किरकोळ अपघाताने त्यांच्या आयुष्यात मोठा बदल झाला. त्यांना कंबरेखालील भागात तीव्र वेदना सुरू झाल्या आणि दैनंदिन हालचाली करणेही कठीण झाले. त्यानंतर त्यांनी तातडीने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारांसाठी धाव घेतली.



खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ. हरीश नाईक यांनी सांगितले,प्राथमिक तपासणीत मणक्याजवळ वेदना आणि पाठीच्या कण्याच्या हालचालींवर मर्यादा आली, मात्र न्यूरोलॉजिकल कार्य सामान्य होते. पुढील तपासणीत मणक्याचे 'ऑस्टिओपोरोसिसमुळे झालेले कॉम्प्रेशन फ्रॅक्चर' याचे निदान झाले. वृद्धांमध्ये हाडे ठिसूळ झाल्यामुळे अशा प्रकारचे फ्रॅक्चर सामान्यपणे आढळून येते. मात्र योग्य वेळी उपचार न झाल्यास हालचालींवर आणि जीवनमानावर गंभीर परिणाम होऊ शकतो. सुरुवातीच्या उपचारांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आम्ही ' बलून व्हर्टिब्रोप्लास्टी (काइफोप्लास्टी)' करण्याचा निर्णय घेतला.

ते पुढे सांगतात की,* या प्रक्रियेत फ्रॅक्चर झालेल्या मणक्यात एक छोटा बलून घालून त्याची उंची पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्यानंतर त्या जागेत 'बोन सिमेंट' भरून मणका स्थिर केला जातो. यामुळे वेदना त्वरीत कमी होतात आणि रुग्णाला लवकर चालता येते. ही प्रक्रिया मिनिमली इन्व्हेसिव्ह प्रक्रिया असल्यामुळे वयोवृद्ध रुग्णांसाठी सुरक्षित ठरते. बहुतांश रुग्णांना २४ ते ४८ तासांत वेदनांपासून आराम मिळतो. तसेच दीर्घकाळ वेदनाशामक औषधांवरील अवलंबित्व कमी होते.

ही प्रक्रिया इमेजिंग मार्गदर्शनाखाली 'ट्रान्सपेडिक्युलर' पद्धतीने करण्यात आली. डी १२ मणक्यात काळजीपूर्वक बलून घालून जागा तयार करण्यात आली आणि मणक्याची उंची अंशतः पुनर्स्थापित करण्यात आली. त्यानंतर त्या जागेत बोन सिमेंट भरून फ्रॅक्चर झालेले हाड स्थिर करण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत अचूकपणे पार पडली.

वृद्ध रुग्णांसाठी अशा प्रक्रियेनंतर शक्य तितक्या लवकर हालचाल सुरू करणे महत्त्वाचे असते, कारण दीर्घकाळ बेडरेस्टमुळे स्नायूंना कमकुवतपणा येतो, संसर्ग किंवा रक्ताच्या गाठी तयार होणे अशा गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. या रुग्णाने उपचारांना चांगला प्रतिसाद दिला. इतरांच्या मदतीने चालणे सुरू केले आणि अल्पावधीतच प्रकृतीत लक्षणीय सुधारणा दिसून आली. योग्य काळजी घेतल्यास अशाप्रकारचे रुग्ण पुन्हा नियमित जीवन जगू शकतात, *असेही डॉ. नाईक यांनी सांगितले.

उपचारानंतर रुग्णाला वॉर्डमध्ये हलवून आयव्ही औषधे, द्रवपदार्थ आणि हळूहळू हलका आहार सुरू करण्यात आला. 'टेलर ब्रेस'च्या सहाय्याने रुग्णाने चालण्यास सुरुवात केली. प्रकृती स्थिरावल्याने आणि उपचारांना चांगला प्रतिसाद मिळाल्याने त्यांना २७ फेब्रुवारी २०२६ रोजी घरी सोडण्यात आले. त्यानंतर तज्ज्ञांनी दिलेली औषधं न वगळता नियमित औषधांचे सेवन करणे, डॉक्टरांचा सल्ल्याशिवाय औषधांचे सेवन बंद न करणे, नियमित फॉलो-अप करणे आणि तेलकट व चरबीयुक्त अन्न पदार्थ टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

पार्किन्सनमुळे आधीच आयुष्य कठीण झाले होते, त्यात पडल्यामुळे परिस्थिती आणखी बिघडली. वेदनांशिवाय चालता येईल अशी आशाच उरली नव्हती. पण याठिकाणी मिळालेल्या अचूक उपचारांमुळे आणि डॉक्टरांच्या पण प्रयत्नांनी मला पुन्हा चालण्यासाठी आत्मविश्वास मिळाला. मी डॉ. नाईक आणि त्यांच्या टीमची आभारी आहे, *असे रुग्ण श्रीमती मीना पवार यांनी व्यक्त केली.

या प्रकरणातून वृद्धांमध्ये पाठीच्या कण्याच्या फ्रॅक्चरच्या उपचारासाठी वेळीच उपचार आणि प्रगत मिनिमली इन्व्हेसिव्ह तंत्रज्ञान किती महत्त्वाचे आहे, हे अधोरेखित होते. योग्य वेळी आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचार मिळाल्यास गंभीर गुंतागुंत असलेल्या रुग्णांनाही चांगले परिणाम मिळू शकतात आणि त्यांचे स्वावलंबन पुन्हा प्राप्त होऊ शकते, असे मेडिकव्हर हॉस्पिटल, नवी मुंबईचे केंद्र प्रमुख संदीप जोशी यांनी स्पष्ट केले.

# आदिवासी समाजाची बदनामी खपवून घेणार नाही; यवतमाळात विविध संघटनांचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** यवतमाळ राळेगाव तालुक्यातून ३४ आदिवासी मुली बेपत्ता झाल्याचा बनाव रचून संपूर्ण समाजाची सार्वजनिक बदनामी करणाऱ्यांविरुद्ध आता आदिवासी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. विशिष्ट राजकीय पक्ष आणि काही संघटनांकडून मानवी तस्करीचे आरोप करत आदिवासी समाजाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा करत, याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांना लेखी निवेदन देऊन फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मागील काही दिवसांपासून सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि वृत्तपत्रांमधून कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय ३४ मुली बेपत्ता असल्याच्या



बातम्या जाणीवपूर्वक प्रसारित केल्या जात आहेत. हा केवळ त्या मुलींचाच नव्हे, तर संपूर्ण आदिवासी समाजाच्या अस्मितेवर झालेला हल्ला असल्याची भावना समाजात निर्माण झाली आहे. "आदिवासी समाज आर्थिकदृष्ट्या गरीब असेल, प्रामाणिकपणे कष्ट करून तो आपले कुटुंब जगतो, पण गरिबीचा अर्थ असा नाही की कोणीही उठून समाजाची अब्रू वेशीवर टांगावी," अशा तिखट शब्दांत ट्रायबल वुमेन्स फोरमने आपला संताप व्यक्त केला आहे.

याप्रकरणी ट्रायबल वुमेन्स फोरमच्या राज्याध्यक्षा मीनाक्षी वट्टी यांनी पोलीस प्रशासनाला कडक अल्टिमेटम दिला आहे. बदनामी करणाऱ्यांनी येत्या दोन दिवसांत जाहीर माफी मागावी, अन्यथा तिसऱ्या दिवशी त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. जर पोलीस तपासात एखादी मुलगी खरोखरच बेपत्ता किंवा तस्करीला बळी पडली असेल, तर त्यातील दोषींवर, मध्यस्थांवर आणि खरेदी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, याला आमचा पाठिंबाच आहे; मात्र त्या नावाखाली सरसकट समाजाला बदनाम करणे तातडीने थांबवावे, अशी विनंतीही संघटनांनी केली आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाने अट्रॉसिटी कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. हे निवेदन देताना ट्रायबल वुमेन्स फोरम, ट्रायबल फोरम आणि कोया पुनेम गोटूल समितीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनामुळे जिल्ह्यात सध्या आदिवासी समाजातील असंतोष शिगेला पोहोचला असून पोलीस प्रशासन आता काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पनवेलमध्ये मराठी जनजागृतीसाठी मनसे रस्त्यावर; रिक्षांवर "मला मराठी येते" स्टिकर अभियान

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर पनवेल, प्रतिनिधी :** मराठी भाषेच्या सन्मानासाठी राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाला पाठिंबा दर्शवत महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्या वतीने पनवेलमध्ये काल विशेष जनजागृती अभियान राबविण्यात आले. पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात शांततामय पद्धतीने रिक्षांवर "मी मराठी बोलतो मला मराठी समजते " असे स्टिकर लावून मराठी भाषेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

या उपक्रमामागील उद्देश मराठी ही महाराष्ट्राची मायबोली असून तिचा वापर वाढावा, प्रत्येक स्तरावर मराठीचा सन्मान व्हावा आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये मराठीबद्दल अभिमान निर्माण व्हावा हा असल्याचे आयोजकांनी सांगितले. राज्य सरकारचा मराठी भाषेला प्राधान्य देण्याचा निर्णय योग्य असून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी मनसे रस्त्यावर उतरून जनजागृती करत असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात




आले.कार्यक्रमात मोठ्या संख्येने मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. रिक्षाचालकांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत मराठी भाषेबाबत आपला पाठिंबा दर्शविला.

यावेळी महानगर सचिव पराग बालड, तसेच वाहतूक सेना जिल्हा संघटक सचिन जाधव यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, "मराठी ही केवळ भाषा नसून आपली ओळख आहे. 'माझी भाषा मराठी – माझा अभिमान' ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजविण्यासाठी असे उपक्रम पुढेही राबविण्यात येणार आहेत."या अभियानामुळे पनवेल परिसरात मराठी भाषेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

# कळंबोलीत रंगला गुरुव्हिला क्रिकेट प्रीमियर लीगचा थरार

## छोट्या मैदानातूनच घडतात मोठे क्रिकेट प्लेअर :रामदास शेवाळे

**दैनिक युवक आधार**

**कळंबोली (दीपक घोसाळकर):** कळंबोलीतील गुरुविला हाउसिंग सोसायटी व गणेश मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने सोसायटीमधीलच तरुणांचे गुरुविला क्रिकेट प्रीमियर लीग चे सामने आयोजित करण्यात आले होते या सामन्यांमध्ये सहा संघांनी सहभाग नोंदवला सकाळपासून क्रिकेट रसिकांना मनमोरात आनंद देणाऱ्या या लीगचा थरार पाहण्यासाठी सोसायटीच्या आवारात क्रिकेट रसिकांनी एकच गर्दी केली होती उद्घाटन प्रसंगी बोलताना पनवेल महापालिकेचे नगरसेवक रामदास शेवाळे म्हणाले की या छोट्या छोट्या मैदानामधूनच देशपातळीवरील मोठे क्रिकेटपटू घडत असतात त्यामुळे अशा क्रिकेट सामन्यांची समाजाला नितांत आवश्यकता आहे.कळंबोली वसाहती मधील गुरु विल्ला हाउसिंग सोसायटी व गुरुविला गणेश उत्सव मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक बॉलच्या तीन ओव्हर च्या मर्यादित क्रिकेट सामन्यांचे आयोजन सोसायटीच्या मोकळ्या भागामध्ये करण्यात आले होते.या मोकळ्या जागेचे रूपांतर मैदानाच्या प्रमाणे आखणी करून चारही बाजूला जाळ्या लावून बंदिस्त करण्यात आले होते.या बॉक्स प्रीमियर लीग चे उद्घाटन पनवेल महापालिकेचे स्थायी समितीचे सभापती नगरसेवक बबन मुकादम व शिवसेना शिंदे गटाचे महानगर जिल्हा प्रमुख व नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढून करण्यात आले. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष जगदीश पाटील सचिव उमाकांत गव्हाणे, खजिनदार राजेंद्र सरगर, सदस्य गहीनाथ



धुमाळ,गणेशोत्सव मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश माने,क्रिकेट सामन्यांचे आयोजक राजू उतेकर,संजय पवार,सचिन लोंढे उपस्थित होते. दिवसभर सुरू असलेल्या या प्रीमियर लीगच्या थरार पाहण्यासाठी आजूबाजूच्या हाउसिंग सोसायटी मधील तरुण क्रिकेटर रसिकांनी एकच गर्दी केली होती या प्रीमियर लीग क्रिकेट सामन्यांमध्ये सोसायटीमधीलच मर्यादित बच्चे कंपनी पासून ते आभाळ वृद्धापर्यंतच्या क्रिकेट प्रेमींनी सहभाग घेऊन स्पर्धेत क्रिकेटचा आनंद मनमुराद लुटला यावेळी विविध बक्षिसांची खैरातही या आयोजकांच्या माध्यमातून करण्यात आली त्यामुळे क्रिकेट रसिकांमध्ये एकच जल्लोष पाहायला मिळाला या सामन्यांमध्ये

.गुरुविला प्रीमियर लीग पर्व १,आयोजक गुरुविला गणेशोत्सव मंडळ कळंबोली, एकूण संघ - सहा होते यामध्ये संघमालक खालील प्रमाणे... गुरुविला पँथर्स - सचिन लोंढे,गुरुविला स्ट्रायकर - सचिन पवार, गुरुविला टायटन्स - सागर धुमाळ

गुरुविला वॉरियर्स - अरविंद चव्हाण गुरुविला प्रीमियर लीग

पर्व १ आयोजक गुरुविला गणेशोत्सव मंडळ

कळंबोली एकूण संघ - सहा संघ सहभागी होते यामध्ये

संघमालक खालील प्रमाणे... गुरुविला पँथर्स - सचिन लोंढे

गुरुविला स्ट्रायकर - सचिन पवार,गुरुविला टायटन्स - सागर धुमाळ,गुरुविला वॉरियर्स - अरविंद चव्हाण गुरुविला किंग्स - सुशांत खैरनार गुरुविला लायन्स - राजू उतेकर यांनी सहभाग नोंदवला. या प्रीमियर लीग मध्ये एकूण १५ साखळी सामने खेळले गेले. यामध्ये झालेल्या ४ सेमी फायनल मध्ये

गुरुविला पँथर्स - सचिन लोंढे,गुरुविला टायटन्स - सागर धुमाळ

गुरुविला वॉरियर्स - अरविंद चव्हाण,गुरुविला लायन्स - राजू उतेकर विजय झाले होते. दिवसभर सुरू राहिलेल्या या थरारक क्रिकेट सामन्यांमध्ये फायनल विजेता गुरुविला टायटन्स ने ने चित्तथारारकरीत्या अखेरची बाजू मारून सामन्यांची मालिका जिंकली या संघाला आयोजकांकडून ट्रॉफी प्रदान करून त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले यावेळी सर्व क्रिकेटपटूंनी एकच जल्लोष करीत सोसायटी दणाणून सोडली.

# माय-लेकासह पित्याचा भीषण अपघातात जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशिम जिल्हा प्रतिनिधी :** आनंद, उत्साह आणि लग्नाच्या सोहळ्याची लगबग... पण नियतीने एका क्षणात सर्व काही हिरावून घेतले. वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर ते वाशिम रोडवरील पार्डी टकमोर (बिटोडा तेली) फाट्याजवळ गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वारा जहागीर येथील रहिवासी संतोष बबन लांभाडे (वय ४२), त्यांची पत्नी कलावती संतोष लांभाडे (वय ३५) आणि मुलगा ईश्वर संतोष लांभाडे (वय १२) हे तिघे आपल्या नातेवाईकाच्या लग्नासाठी तांदळी शेवई येथे जात होते. दुसऱ्या दिवशी सकाळी होणाऱ्या लग्नाच्या मुख्य सोहळ्यासाठी ते मोठ्या उत्साहात घरातून निघाले होते.

मात्र, सायंकाळी सुमारे ५:३० ते ५:४५ वाजण्याच्या दरम्यान पार्डी टकमोर




फाट्याजवळ त्यांच्या दुचाकीला आंब्याने भरलेल्या भरधाव पिकअप वाहनाने समोरून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर दूर फेकले गेले.

या अपघातात संतोष लांभाडे, कलावती लांभाडे आणि त्यांचा १२ वर्षीय मुलगा ईश्वर यांचा गंभीर दुखापतीमुळे जागीच मृत्यू झाला. काही क्षणांपूर्वी लग्नाच्या आनंदात असलेले हे कुटुंब क्षणार्धात मृत्यूच्या विळख्यात सापडल्याने प्रत्यक्षदर्शींनाही धक्का बसला.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत तिघांचाही मृत्यू झाला होता. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, वारा जहागीर गावावर शोककळा पसरली आहे.

लग्नाच्या आनंदासाठी निघालेल्या एका कुटुंबाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण गाव सुन्न झाले आहे. एका क्षणात घरातील कर्ता पुरुष, आई आणि निरागस लेकरू हरपल्याने नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# पिंप्री जिल्हा परिषद शाळेत लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळा; माजी विद्यार्थ्यांचा गौरव





## शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रेरणास्थान: सौ. अनिता बनकर

**पिंप्री येथील जिल्हा परिषद शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवणारे प्रेरणास्थान ठरली आहे. गेल्या वीस वर्षांपासून गावातील पालकांचा या शाळेवर असलेला दृढ विश्वास हीच तिची खरी ओळख आहे. इतर पर्याय उपलब्ध असतानाही गावातील विद्यार्थी आवर्जून याच शाळेत प्रवेश घेतात, ही बाब शाळेच्या गुणवत्ता, संस्कारमूल्ये आणि शिक्षकांच्या समर्पणाची साक्ष देते. या यशामागे शिक्षकांचे निष्ठापूर्ण कार्य, विद्यार्थ्यांप्रती असलेली आपुलकी आणि गावकऱ्यांचा सक्रिय सहभाग यांचा मोठा वाटा आहे. शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणीवा रुजवण्याचे कार्य ही शाळा सातत्याने करत आहे. या आदर्श शाळेच्या उभारणीत योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन. भविष्यातही ही शाळा प्रगतीची नवीन शिखरे गाठत राहो, हीच अपेक्षा.**

**— सौ. अनिता सुरेश बनकर, सभापती, पंचायत समिती सिल्लोड**

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख सिल्लोड:** -पिंप्री (ता. सिल्लोड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवनिर्वाचित जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीचे सभापती, उपसभापती व सदस्यांचा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. याच कार्यक्रमात इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभही आयोजित करण्यात आला होता. या शाळेतून शिक्षण पूर्ण करून प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात मान्यवरांनी शाळेची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.या सत्कार सोहळ्याप्रसंगी भाजपा प्रदेश चिटणीस तथा सिल्लोड-सोयगाव विधानसभा नेते सुरेशजी बनकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील मोठे, पंचायत समिती सभापती सौ. अनितताई बनकर, जिल्हा परिषद सभापती सौ. अनितताई मोठे, पंचायत समिती उपसभापती भगवान आहेर, पंचायत समिती सदस्या सौ. सुमित्राताई बन्सोड, गटशिक्षणाधिकारी ठाकूर, सरपंच भागाबाई सिरसाठ, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विठ्ठल लोखंडे, केंद्रप्रमुख एस. ए. बडक, किशोर जगताप आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन मुख्याध्यापक एच. बी. गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी शिक्षक व्ही. एन. पवार, जी. आर. देवकर, बी. जी. घाळगीर, पी. ए. वारूळकर, सी. एस. विश्वंभर, एस. एम. चितोडे, सर्जेराव पा. सिरसाठ, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, गावकरी मंडळी, जिल्हा परिषद शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना पक्ष कार्यालयाकडून 'राष्ट्रीय शिव स्वराज्य सेना'ला मान्यता अध्यक्ष जितेंद्र दगडू(दादा) सकपाळ यांना अधिकृत पत्र

**दैनिक युवक आधार**

**मुंबई(शांताराम गुडेकर ) :** शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाकडून समाजात विविध स्तरावर सामाजिक कामात अग्रेसर असलेल्या 'राष्ट्रीय शिव स्वराज्य सेना' या संस्थेला शिवसेना पक्षाशी संलग्न संस्था म्हणून अधिकृत मान्यता देण्यात आली आहे.यासंदर्भातील अधिकृत पत्र संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र दादू (दादा) सकपाळ यांना देण्यात आले आहे.दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या या पत्रामध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेने आणि शिवसेनेचे मुख्य नेते,महाराष्ट्राचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे व शिवसेना नेते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार ही मान्यता देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.यावेळी अध्यक्ष जितेंद्र (दादा) सकपाळ यांच्या नेतृत्वाखाली 'राष्ट्रीय शिव स्वराज्य सेना' शिवसेनेच्या विचारांचा प्रचार-प्रसार अधिक जोमाने करेल तसेच संघटनेच्या माध्यमातून पक्षवाढीसाठी सक्रिय योगदान देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.हे पत्र शिवसेना सचिव संजय भाऊसाहेब मोरे यांच्या स्वाक्षरीने बाळासाहेब भवन येथे देण्यात आले असून, या मान्यतेमुळे अध्यक्ष जितेंद्र दगडू(दादा) सकपाळ यांच्या नेतृत्वाखालील कार्याला अधिकृत बळ मिळाले असल्याचे मानले जात आहे.



तसेच बाळासाहेब भवन येथे सफाई कर्मचारी आयोग महाराष्ट्र राज्य(राज्यमंत्री दर्जा) चे माजी अध्यक्ष व विद्यमान उपाध्यक्ष मुकेश सारवान,शिवसेना राष्ट्रीय समन्वयक दिनेश शिंदे व संपर्कप्रमुख मावळ लोकसभा व माजी नगरसेवक प्रशांत पालांडे यांच्या शुभहस्ते शिवसेना प्रणित राष्ट्रीय शिव स्वराज्य सेनेच्या बदललेले प्रतीक(सिम्बॉल) चे उद्घाटन करण्यात आले.यावेळी अखिल भारतीय केबल सेनेचे सचिव राजेश जैन,शिवसेना माजी सैनिक सेल चे अध्यक्ष ॲड.सरदार चोपडे, शिवसेना सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कार्यकारी परिषद सदस्य नाथाजी चौगुले,शिव शक्ती वाहतूक सेनेचे अध्यक्ष अली भाई,उपाध्यक्ष सय्यद जावेद,लायन विजय रायमाने, लायन मोहन वायदंडे,लायन नितीन कोलगे,लायन संजू सासमल,मानव अधिकारीचे आकाश कासारे,शिवतत्त्व प्रतिष्ठान चे अध्यक्ष सोहम पाटकर,क्षितिज सकपाळ,नील सकपाळ, सिद्धेश बाळसराफ,मनोज चौरसिया,समीर भंडारे व इतर पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

# श्री क्षेत्र अडुळा बाजार येथील माध्यमिक विद्यालयात जागतिक पुस्तक दिन साजरा



**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** अडुळा बाजार (प्रतिनिधी ) आजच्या इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचन फार क्वचित लोक करतात वाचन संस्कृती जोपासण्याच्या उद्देशाने व पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने जागतिक पुस्तक दिन साजरा करणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक व संस्थेचे सचिव प्रदीप लांडे यांनी स्थानिक माध्यमिक विद्यालयात आयोजित आरोग्य, शिक्षण व क्रीडा विषयक शिबिरा प्रसंगी केले. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ग्रामदैवत श्री संत लहानुजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त गजानन करूले, संचालक हरिदास कविटकर, मुख्याध्यापक बी. एल. हाडोळे, ज्येष्ठ शिक्षिका निता मळसने, अनिल शामतकर उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन नितीन जुनगरे तर आभार प्रदर्शन अनिल तायडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भानुदास मावळे, प्रदीप कंटाळे व इतरांनी सहकार्य केले.

# झोप ही जगण्यासाठी अत्यावश्यक: रजोनिवृत्तीतील मानसिक आरोग्यावर तज्ज्ञांचा भर

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : मेनोपॉज सोसायटी नागपूर आणि NARCHI नागपूर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने रजोनिवृत्तीतील मानसिक आरोग्यावर सीएमईचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. प्रगती खलातकर (अध्यक्ष, MSN) यांनी केले, तर डॉ. अलका मुखर्जी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

मानसोपचार तज्ज्ञ डॉ. कनक गिल्लुरकर शर्मा यांनी नैराश्य (डिप्रेशन) विषयावर मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रत्येक तीन पेरिमेनोपॉज स्त्रियांपैकी एक स्त्री नैराश्याने प्रभावित असते.



मात्र, बहुतेक वेळा ही लक्षणे हार्मोनल बदल समजून दुर्लक्षित केली जातात, त्यामुळे निदान व उपचार होत नाहीत. त्यांनी रजोनिवृत्तीचा दृष्टिकोन केवळ लक्षणांपुरता न ठेवता स्त्रीच्या संपूर्ण पुनर्स्थापनेवर असावा असे सांगितले.

डॉ. प्रगती खलातकर यांनी अनिद्रा (इन्सोम्निया) या विषयावर भाष्य करताना झोप ही अन्नाइतकीच आवश्यक असल्याचे सांगितले. झोपेमुळे शरीराची ऊर्जा पुनर्भरण होते, विषारी घटकांचे विसर्जन होते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि स्मरणशक्ती मजबूत होते. झोपेअभावी उच्च रक्तदाब, मधुमेह, डिमेन्शिया, अल्झायमर, दीर्घकालीन थकवा आणि नैराश्य यांसारख्या समस्या निर्माण होतात. त्यांनी "अर्बन इन्सोम्निया" या संकल्पनेवरही प्रकाश टाकला, जी मोबाईल, लॅपटॉप, संगणक यांमधून येणाऱ्या ब्लू लाईटमुळे सर्केडियन रिदम बिघडल्याने निर्माण होते. दररोज ६–८ तासांची गुणवत्तापूर्ण झोप आणि योग्य स्लीप हायजिन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जेरियाट्रिक तज्ज्ञ डॉ. शीतल साने यांनी डिमेन्शियावर भाष्य करताना सुरुवातीच्या लक्षणांची, विशेषतः विस्मरणाची, वेळेत ओळख करून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी "ब्रेन जिम", मानसिक सक्रियता, योग्य आहार आणि पुरेशी झोप यामुळे डिमेन्शिया आणि अल्झायमर टाळता येऊ शकते असे नमूद केले.

तज्ज्ञांनी सांगितले की पेरिमेनोपॉज काळातील हार्मोनल असंतुलनामुळे हॉट फ्लॅशेस, मूड स्विंग्स आणि झोपेचे विकार वाढतात, ज्यामुळे जीवनमानावर परिणाम होतो. योग्य वेळी जीवनशैलीत बदल करणे अत्यंत आवश्यक आहे.

डॉ. शिवांगी जहागिरदार यांनी फायब्रॉइड्सच्या वैद्यकीय व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

या सीएमईस डॉ. मनोरमा पुरवार, डॉ. नीलम पुनियानी, डॉ. अंकिता कोठे, डॉ. दर्शना घोषे आणि डॉ. प्रज्ञा गिजरे यांनी अध्यक्षस्थान भूषवले. डॉ. भक्ती गुर्जर यांनी आभार प्रदर्शन केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मुर्खन शेख यांनी केले.

मेनोपॉज सोसायटी नागपूरने सर्वांना आवाहन केले की, आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे आणि त्यांच्या लहानसहान तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये.

# भांडी संच वाटपात मोठा घोटाळा! दलालांचा उच्छाद, मजुरांची उघड लूट – प्रशासनाचा फ्लॉप शो उघड

**1700 उकळून किट देण्याचा प्रकार; अनसिंग केंद्रावर अमानुष व्यवस्थेमुळे कामगारांचा संताप उसळला**

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यातील अनसिंग येथे सुरू असलेला बांधकाम कामगारांसाठी भांडी संच वाटपाचा प्रकार हा केवळ हलगर्जीपणाचा नसून थेट मजुरांच्या हक्कावरचा गंभीर घोटाळा असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शासनाच्या योजनेचा उद्देश गरीब कामगारांचे जीवनमान उंचावणे असताना, प्रत्यक्षात मात्र या योजनेचा उघड बाजार मांडण्यात आल्याचा आरोप होत आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे पाटील आणि वाशिम जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांनी या प्रकारावर तीव्र संताप व्यक्त करत प्रशासनावर थेट निशाणा साधला आहे.

केंद्रावर कामगारांना भांडी संच प्रत्यक्ष देण्याऐवजी केवळ भांड्यांसोबत फोटो काढून "वाटप पूर्ण" दाखवले जात असल्याचे प्रकार उघड झाले आहेत. अनेक कामगारांना प्रत्यक्षात कोणतेही साहित्य न देता रिकाम्या हाताने परत



पाठवले जात असल्याने संतापाची लाट उसळली आहे. कागदोपत्री यश दाखवण्यासाठी चालवली जाणारी ही बनवाबनवी मजुरांच्या घामाची थट्टा असल्याची भावना व्यक्त होत आहे. या संदर्भात गजानन कावरखे पाटील यांनी "हा प्रकार म्हणजे गरीब मजुरांच्या हक्कांवर उघड डाका आहे," असे स्पष्ट शब्दांत सांगत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

याहूनही गंभीर बाब म्हणजे, केंद्रावर काही दलालांकडून उघडपणे "₹1700 रुपये द्या, भांडे किट मिळेल" असे आमिष दाखवून फसवणूक केली जात आहे. गरीब व गरजू कामगारांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत दलालशाहीने अक्षरशः माजल्याचा आरोप होत आहे. यावर बालाजी पाटील मोरे यांनी "हा प्रकार थांबवला नाही, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करू," असा इशारा देत प्रशासनाला थेट आव्हान दिले आहे.

दरम्यान, केंद्रावरील परिस्थिती अत्यंत अमानुष असल्याचे चित्र आहे. पहाटेपासून रांगेत उभ्या असलेल्या कामगारांसाठी पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही. कडक उन्हात सावली, मंडप किंवा बसण्याची सोय नसल्याने महिला व वृद्ध कामगारांची प्रचंड हालअपेष्टा होत आहेत. अन्न-पाण्याविना ताटकळत असलेल्या कामगारांकडे अधिकाऱ्यांचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याने नाराजी तीव्र झाली आहे.

या पार्श्वभूमीवर गजानन कावरखे पाटील आणि बालाजी पाटील मोरे यांनी संयुक्तपणे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे.

या सर्व प्रकारामुळे हा केवळ निष्काळजीपणा नसून संगनमताने चालणारा भ्रष्टाचार असल्याचा संशय बळावला आहे. मजुरांच्या हक्काच्या साहित्याचा अपहार करून दलालांच्या माध्यमातून पैसे उकळण्याचा हा प्रकार तात्काळ थांबवला नाही, तर मोठा जनआक्रोश उसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, गैरप्रकारात सहभागी अधिकारी व दलालांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, सर्व पात्र कामगारांना भांडी संच पारदर्शक व सन्मानपूर्वक वितरित करावा तसेच केंद्रावर पिण्याचे पाणी, सावली व बसण्याची व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशा ठाम मागण्या करण्यात आल्या आहेत.

मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला असून "मजुरांच्या घामाची लूट सहन केली जाणार नाही — हक्क मिळेपर्यंत लढा सुरूच राहील!" असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला. या वेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे पाटील, वाशिम जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे, तालुकाध्यक्ष प्रविण मते आदी उपस्थित होते.

# एआय-आधारित होम इंटीरियर ब्रँड शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : होमलेन या भारतातील आघाडीच्या तंत्रज्ञान व एआय-आधारित होम इंटीरियर ब्रँडने नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे आपला पहिला स्टुडिओ लाँच केला आहे. प्रबळ पायाभूत सुविधा आणि मुंबई महानगर क्षेत्राशी असलेल्या उत्तम कनेक्टिव्हिटीमुळे बेलापूर हे महत्त्वाचे व्यापारी आणि निवासी केंद्र म्हणून ओळखले जाते. हा स्टुडिओ संतोष कुमार जे आणि पार्थिबन सुधमन यांच्या भागीदारीत सुरू करण्यात आला आहे . होमलेनचे सह-संस्थापक आणि सीओओ तनुज चौधरी म्हणाले, नवी मुंबई आमच्यासाठी नेहमी महत्त्वाची बाजारपेठ राहिली आहे, विशेषतः सीबीडी बेलापूरसारखी ठिकाणे, जिथे प्रबळ पायाभूत सुविधांमुळे निवासी क्षेत्रात शाश्वत वाढ होत आहे. या सहयोगाबाबत मत व्यक्त करत



संतोष कुमार जे म्हणाले, नवी मुंबईसारख्या बाजारपेठांमध्ये आता संघटित इंटीरियर सोल्यूशन्सला अधिक पसंती दिली जात आहे. या लाँचसह, होमलेनने शहरी बाजारपेठांमध्ये आपला विस्तार सुरूच ठेवला आहे, तसेच सुलभ उपलब्धता, स्थानिक भागीदारी आणि तंत्रज्ञानावर आधारित सुव्यवस्थित इंटीरियर अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

# दुहेरी निकषांचा सवाल : HSR नियम फक्त गरिबांसाठीच का?

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : विश्वदीप कांबळे** : नांदेड शहरात वाहतूक नियमांच्या अंमलबजावणीवरून दुहेरी निकष लावले जात असल्याचा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे. सामान्य नागरिकांकडे हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन (HSR) नंबर प्लेट नसल्यास तात्काळ दंडात्मक कारवाई केली जाते, मात्र काही शासकीय वाहनांकडून याच नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे.अलीकडे "महाराष्ट्र शासन" असे नमूद असलेल्या एका शासकीय वाहनाचा फोटो चर्चेत आला असून, संबंधित वाहनावरील नंबर प्लेट नियमांनुसार नसल्याची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे अशा वाहनांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एका बाजूला सर्वसामान्य वाहनधारकांना HSR प्लेट नसल्यामुळे दंड आकारला जातो, तर दुसरीकडे शासकीय वाहनांबाबत शिथिलता दाखवली जात असल्याने "कायदा फक्त गरिबांसाठीच का?" असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. वाहतूक नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. मग ते सामान्य नागरिक असोत किंवा शासकीय अधिकारी. प्रशासन स्वतः नियमांचे पालन करत नसेल, तर नागरिकांकडून नियमपालनाची अपेक्षा कशी करायची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.नागरिकांनी सर्व वाहनांवर HSR प्लेट सक्तीने लागू करण्याची, शासकीय वाहनांची विशेष तपासणी करण्याची आणि नियमभंग करणाऱ्यांवर कोणतीही सूट न देता कारवाई करण्याची मागणी केली आहे.या प्रकारामुळे केवळ अन्यायाची भावना निर्माण होत नसून कायद्यावरील विश्वासालाही धक्का बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन "सर्वांसाठी समान नियम" ही भूमिका कृतीतून दाखवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी,कार्यकर्त्यांची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**

**. तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर(दि.२५) महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खंदे समर्थक शिवसेना गटाचे नेते ओबीसी विजेएनटीचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किशवे यांना शिवसेना पक्षाकडून आगामी विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात यावी अशी जोरदार मागणी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.ही मागणी अहिल्यानगर येथील ओबीसी नेते शिवाजी त्र्यंबक गजभार यांनी केली आहे.यावेळी गजभार यांनी सांगितले की बाळासाहेब किशवे हे सामान्य कुटुंबातून आलेले लढवय्ये नेते असून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात तळागाळातूनच केली आहे त्यांनी समाजासाठी वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन केले व गरजु रुग्नांना शिबिराच्या माध्यमातुन आजारावर निदान मिळवुन दिले आहे समाजाच्या हक्कासाठी अहोरात्र झटणारे



लढवय्ये समाजसेवक म्हणुन प्रचीत आहेत महाराष्ट्र कर्णाटक राज्यात त्यांचा दांडगा लोक संपर्क असुन त्याचा फायदा पक्षाला नक्कीच होईल त्यांनी शिवसेनेची विचारधारा गावागावात आणि खेड्यापाड्यात पोहोचवण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली आहे किशवे यांनी शिवसेना ओबीसीच्या माध्यमातून गोरगरीब वंचित आणि मागासवर्गीय घटकांची मजबूत संघटना उभी केली आहे तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील विचारसरणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्यकर्त्यांची दखल घेऊन शिवसेना नेतृत्वाने आगामी विधान परिषद निवडणुकीत त्यांना उमेदवारी देऊन ओबीसी व विजेएनटी यांची घटकातील कार्यकर्त्यांना न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा गजभार व आनंद धुळगंडे,अनील धगनरे,अमोल गवते,ज्ञानेश्वर धुळगंडे,राम खरात,पवन धुळगंडे ,बालाजी थगनरे,मोहन थगनरे,हणमंत डोरगळे,शंकर डेमाले,श्रीधर धुळगंडे आदी त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# 'सुखी माणसाचा सदरा' म्हणजेच चंद्रकांत मढवी !; माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचे गौरोदगार

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "काही कर्मचारी सेवेत असताना कामापेक्षा उचापती जास्त करतात; परंतु चंद्रकांत मढवी यांनी कामावर निरपेक्ष प्रेम केले. त्यांनी आपली जीवनशैली आणि कामाप्रती असलेले उत्तरदायीत्व यांची उत्तम सांगड घातली. समर्थ रामदास स्वामींनी सांगितले आहे की, 'जगी सर्व सुखी असा कोण आहे'. त्यामुळे आपणही सुखी माणसाचा सदरा शोधायला जातो; परंतु ३० वर्षांच्या सेवापूर्तीनंतरही चंद्रकांत मढवी यांच्याकडे बघून वाटते ते सुखी माणसाचा सदरा लेवून आले आहेत," असे गौरोदगार माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आणि ज. आ. भगत ज्युनियर महाविद्यालय गव्हाण-कोपर येथे काढले. श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचे वरिष्ठ कर्मचारी चंद्रकांत मढवी







यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार रामशेठ ठाकूर होते. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत म्हणाले, "भगत साहेबांनी चांगली माणसे पेरली. त्यांचा वसा रामशेठ ठाकूर चालवतात. रयत शिक्षण संस्थेसाठी तर ते सर्वाधिक मोठे देणगीदार आहेत. साहजिकच 'रयत'मध्ये त्यांच्या शब्दाला कमालीचा मान आहे. त्यांच्यामुळेच आज 'रयत'मध्ये अनेकांचे भले झाले आहे. 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यांमध्येही अनेकांना मानाचे स्थान मिळाले आहे. आपल्याला आयुष्य जगता आले पाहिजे. सतत समाजासाठी काम केले पाहिजे. आपल्यावर असणारी जबाबदारी प्रामाणिकपणे पेलली पाहिजे. चंद्रकांत मढवी हे अजातशत्रू आहेत. त्यांनी आपल्या कामाने सर्वांवर छाप पाडली आहे."

चंद्रकांत गजानन मढवी हे सेवानिवृत्त झाले.

त्यांचा सेवापूर्ती समारंभ शुक्रवारी (ता.२४) विद्यालयात झोकात झाला. यावेळी त्यांचा माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सपत्निक सत्कार करण्यात आला. यावेळी मढवी यांच्यावर प्रेम करणारे, तसेच कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रामाणिकपणा, साधा व सरळ माणूस अशा भावनाही अनेकांनी व्यक्त केल्या. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्रशेठ घरत, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, चेअरमन अरुणशेठ भगत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, मो. का. मढवी गुरुजी, अनंता ठाकूर, विजय घरत, माईताई भोईर, प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, व्ही. वाय. लेंभे, महेश म्हात्रे आणि विद्यालयाचा कर्मचारी वृंद उपस्थित होता. सागर रंधवे यांनी सूत्रसंचालन केले.

# चौकशी आदेश असूनही कारवाई शून्य; बोर्ली ग्रामपंचायतीत कोट्यवधींचा निधी अपहार, प्रशासनाची मूक भूमिका संशयास्पद!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतीत विकासकामांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक निधी लाटल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. आरटीआय कार्यकर्ते प्रतीक कणगी यांनी २५ मार्च २०२६ रोजी कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात तक्रार नोंदवली, तत्काळ चौकशीचे आदेश मिळाले. जिल्हा परिषद रायगड ने १ जानेवारी २०२६ पर्यंत चौकशी पूर्ण केली, मात्र २३ एप्रिल २०२६ पर्यंत ना फौजदारी गुन्हा दाखल झाला, ना प्रशासकीय कारवाई! शासनाच्या ४ जानेवारी २०१७ च्या परिपत्रकानुसार १ महिन्यात कारवाई बंधनकारक असताना प्रशासनाची 'मूकदर्शक' भूमिका भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असल्याची टीका होत आहे. *बनावट जिओ-टॅगिंग आणि जुनी गटारांचा खेळ: ग्रामस्थांच्या डोळ्यांना पुरावा!*

गणेश आळी ते नांदगावकर घरापर्यंतचा रस्ता प्रत्यक्षात अस्तित्वात



नसताना इतर ठिकाणचे फोटो वापरून बनावट जिओ-टॅगिंग करून निधी खर्च दाखवला गेला. सुर्इ अंतर्गत गटार बांधकामासाठी नवीन निधी मंजूर केला, पण प्रत्यक्षात ते १५-२० वर्षांपूर्वीचे जुनेच गटार असल्याचा ग्रामस्थांचा पुरावा. यामुळे सरपंच, ग्रामसेवक, गटविकास अधिकारी, बिडीओ,अभियंता व ठेकेदार , संगनमत असल्याचा आरोप प्रतीक कणगी यांनी केला आहे. हे प्रकरण जाणीवपूर्वक दडपले जात असल्याचा संशय व्यक्त करत, लोकायुक्त व उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा दिला.

*पैशाच्या लालचीचे भयंकर रूप;गरीब ग्रामस्थांच्या तोंडून खाद्य धान्य काढले!*

पैशाची लालच किती घाणेरडी असते, याचे ज्वलंत उदाहरण बोर्ली ग्रामपंचायत! १५व्या वित्त आयोगाच्या निधीने कोट्यवधींचा अपहार करून गरीब ग्रामस्थांच्या विकासकामांचे स्वप्न भंग केले. बनावट कागदपत्रे, जुन्या कामांना नवीन निधी, जिओ-टॅगिंगचा खेळ – हे सगळे लालचीच्या ज्वालेतून घडले. अशा लालचीमुळे गावकऱ्यांना रस्ते, गटारे, पाणी अडकले, आणि भ्रष्टाचाराची मुळे खुपसत आहेत. ही लालच समाजाला विपरीत करत असून, दोषींना कठोर शिक्षा देऊनच अद्दल घडेल!

*सत्तेचा दुरुपयोग: निवडून आलेल्या पुढाऱ्यांची खरी तोंडं उघडली!*

निवडून आलेले पुढारी सत्तेचा दुरुपयोग करून सार्वजनिक निधी लुटत आहेत. बोर्ली ग्रामपंचायतीचे पुढारी बाहेरून पाठबळ देणारे मोठे नेते यांसारख्या नेत्यांना ग्रामस्थांच्या विश्वासाचा बघा! सत्ता मिळाली म्हणजे निधीचा अपहार, बेकायदेशीर कामे – हे लोकशाहीला कलंक! अशा पुढाऱ्यांना चौकशीत अद्दल देऊनच जनतेचा विश्वास वाचेल. राजेश वाडेकर, पंचायत समिती मुरुड यांनी प्रत्यक्ष पाहणी करून "काम दिसले नाही" असा अहवाल वरिष्ठांना पाठवला, तरीही कारवाई शून्य! प्रशासन कधी जागे होणार?

*शासनाच्या कान खणणे वेळेची: वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी!*

शासनाने तत्काळ हस्तक्षेप करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अपहार रक्कम वसूल करावी.

मुरुड पंचायत समिती च्या पाहणीनुसार कामच नाही, तरी प्रशासन बंद दारात गुप्तता का? हे प्रकरण भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यक. रायगड जिल्हा सध्या या प्रकरणाकडे डोळे लावून पाहत आहे!

# भाषा वादाऐवजी मराठी शिकण्याचा संकल्प करावा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : रिक्षा चालक हा सर्वसामान्य नागरिक असून तो मराठी भाषा नक्कीच शिकेल, मात्र त्याच्या नावावर राजकारण करू नये, असे मत युवक जिल्हाध्यक्ष सचिनभाऊ लोंढे यांनी व्यक्त केले. संप करण्यापेक्षा “मराठी शिका” असा सकारात्मक संकल्प केल्यास भाषा वाद आपोआप मिटेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उत्तर भारतीय समाज बांधवांना उद्देशून बोलताना त्यांनी सांगितले की, काही राजकीय पक्ष केवळ निवडणुकांच्या काळात तुमचा वापर करत आहेत, हे ओळखण्याची गरज आहे. बाजारपेठेतील छोटे-मोठे व्यवसाय अडचणीत असताना भाषा वाद उकरून काढून समाजात तणाव निर्माण केला



जात आहे, असा आरोपही त्यांनी केला.

महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाने मराठी भाषेचा आदर राखत ती शिकणे आवश्यक आहे. अनेक समाज बांधव उत्तम मराठी बोलतात, याचा अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले.

सध्याच्या घडीला महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महिला अत्याचार आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमती या गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष व्हावे, यासाठीच सत्ताधारी पक्षांकडून भाषा वादासारखे मुद्दे पुढे आणले जात असल्याचा गंभीर आरोप लोंढे यांनी केला.

शेवटी त्यांनी नागरिकांना आवाहन करताना म्हटले की, “मित्रांनो, सावध रहा. महागाई, बेरोजगारी, महिला सुरक्षा आणि भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणे आजची खरी गरज आहे.”

# क्रीडा भारती मुंबई महानगरातर्फे १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या कबड्डी प्रशिक्षण शिबिराचे शानदार उद्घाटन...!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई: प्रतिनिधी केतन भोज** : कबड्डी या देशी खेळाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी आणि भावी आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्याच्या उद्देशाने, क्रीडा भारती मुंबई महानगर यांच्या वतीने दि. १७ ते १९ एप्रिल २०२६ या कालावधीत विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे दिमाखदार उद्घाटन क्रीडा भारतीचे अखिल भारतीय सचिव श्री. राज चौधरी आणि प्रांत मंत्री श्री. बाळ धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या तीन दिवसीय शिबिरामध्ये मुंबई महानगरातील एकूण १०६ बाल खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये ६८ मुले आणि ३८ मुलींचा समावेश असून, त्यांच्यातील क्रीडा नैपुण्य विकसित करण्यासाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन दिले जात आहे.

अनुभवी प्रशिक्षक शिबीर प्रमुख सौ. सिमरत गायकवाड आणि सुनील खोपकर यांच्या








नेतृत्वाखाली प्रशिक्षकांची मोठी फौज या मुलांवर मेहनत घेत आहे. यामध्ये प्रामुख्याने: उपाध्यक्ष: रवींद्र करमळकर, कार्यवाह: श्री. प्रताप परब, प्रशिक्षक गट: पोर्णिमा राणे, सरिता कदम, योगेश कोकाटे, सरला खरात, वैशाली सावंत, विनीता गुजर, अर्चना गोऊळकर, बुशरा अन्सारी, प्रनिल पानवलकर आणि संतोष साळकर यांचे मार्गदर्शन लाभले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विठ्ठल जाधव आणि डॉ. प्रागजी वाझा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

**जागतिक दर्जाचे खेळाडू घडवण्याचा संकल्प**

उद्घाटन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, कबड्डी आता केवळ मातीतील खेळ राहिला नसून त्याला जागतिक ग्लॅमर प्राप्त झाले आहे. १४ वर्षांखालील वयोगटातच मुलांवर योग्य संस्कार आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळाल्यास, भविष्यात हेच खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या शिबिरामुळे उदयोन्मुख खेळाडूंना नवीन तंत्रे शिकायला मिळत असून, क्रीडा प्रेमींकडून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# अखेर ५ कोटी खर्चून उभारलेल्या चऱ्हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला वीज जोडणी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** - बीड तालुक्यातील चऱ्हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला तब्बल ९ वर्षांनंतर अखेर वीज जोडणी मिळाल्याने संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे. सुमारे ५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले हे केंद्र सुरुवातीपासूनच विजेअभावी निष्क्रिय अवस्थेत होते. मात्र सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे(लिंबागणेशकर) यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर हा प्रश्न मार्गी लागला. वीज जोडणी नसल्यामुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नव्हते. प्रसूती, शस्त्रक्रिया व आंतररुग्ण विभागाच्या सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना उपचारासाठी बीड शहरात जावे लागत होते. परिणामी नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली




गेल्या तीन वर्षांपासून विविध आंदोलनांचा मार्ग अवलंबण्यात आला. रास्ता रोको, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन या सह अखेर चऱ्हाटा येथील काकदरा साठवण तलावात जल समाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल घेत जिल्हा प्रशासनाने आरोग्य केंद्राच्या विद्युतीकरणासाठी निधी मंजूर केला. दरम्यान, या पूर्वी १६ लाख रुपयांचा निधी दोन वेळा उपलब्ध होऊन ही बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे तो अखर्चित राहिल्याने काम रखडले होते. अखेर जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्या पुढाकाराने जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत १० लाख रुपयांचा निधी मंजूर करून विद्युत रोहित्र बसविणे व इतर आवश्यक कामे पूर्ण करण्यात आली. वीज जोडणी झाल्यामुळे आता आरोग्य केंद्रात नियमित सेवा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून परिसरातील रुग्णांची होणारी हेळसांड थांबणार आहे. तसेच बीडला उपचारासाठी जाण्याचा आर्थिक भुर्दंडही वाचणार असल्याची प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. या यशाबद्दल डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार, मनोज तांदळे, सुभाष बांगर, संपत नागरगोजे, सूर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव, भगिरथ उबाळे सह आदी आंदोलनकर्त्यांनी समाधान व्यक्त केले असून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांचे आभार मानले आहेत.

# कोरियाच्या निशस्त्र सीमारेषेवरून......

'ओ सर!', मी दजकूर मागे पाहिले. महेश, महेश साळवे आमचा टूर मॅनेजर भेदरलेल्या नजरेने माझ्याकडे पहात होता. अहो, आपण विसैनिकीकृत क्षेत्रात असलो तरी, येथून उत्तर कोरियाच्या भागाचे फोटो घेण्यास सक्त मनाई आहे. का उगाच नसत बालंट ओढावून घेता?

**मी कॅमेऱ्याच्या डोळ्यावर झाकण घातलं. पण, मनाचे झाकण सताड मोकळं झालं....!**

मानवाला जगण्याची जाण आली तेव्हापासून सगळ्याच धर्मांतील साधु-संत, महंत, विचारवंत यांनी शांती, समन्वय आणि माणुसकी हाच मानवी जीवनाचा आणि विकासाचा मार्ग आहे, असे सांगितले. धर्मग्रंथातून लिहिले. पण, माणूस माणसाच्याच विरोधात कायम संघर्ष करत राहिला हेच इतिहासातील पाना-पानावर दिसते आहे. हे नवल नाही का?

1950 पूर्वी, कोरिया हा अखंड, एकजिनशी, सलग, एकाच प्रशासनाचा भाग होता. पण माणसा-माणसातील स्वार्थस्पर्धा आणि अतीव महत्त्वकांक्षेमुळे तीन वर्ष कोरियन रक्तमांसाचे विभाजन कोरियानांनीच केले. 27 जुलै 1953 मध्ये पैनमूनजोम मध्ये युद्धविराम समझोत्यावर हस्ताक्षर झाले खरे पण, अखंड कोरियाचे दक्षिण आणि उत्तर कोरियात विभाजन करूनच!

टूर गाईड पोटतिडकेने सांगत होता....आपण सारे डोरा ऑब्झर्व्हेटरी येथे आहोत. खरं तर ही वेधशाळा आहे. हे स्थळ 38 व्या अक्षांश रेषेवर दक्षिण कोरियात आहे. सिओल पासून केवळ एक तासाच्या अंतरावर असलेले हे ठिकाण डीएम झेड (DMZ) म्हणजे कोरियाई विसैन्यीकीकृत ठिकाण दोनशे पन्नास किमी लांब, चार किलोमीटर रुंदीचे क्षेत्र आहे. डोरा ऑब्झर्वेटरी ही 304 चौरसफूट असून येथे एकाच वेळी 500 पर्यटकांना उत्तर कोरियाचे निरीक्षण करता येते. ते पहा प्रचारगाव, केसोंग शहर, पानमुनजोम, उत्तर कोरियातील डोंगरद-या आणि हो इस 918 ते इस 1392 दरम्यान गोरिओ कालखंडातील कोरियाची राजधानी...

टूर गाईडची टकळी सुरूच होती पण, दिसत तर काहीच नव्हतं? कदाचित गतकाळाच्या वेदनादायी आठवणी जागा झाल्यामुळे, एखाद्या नववधू सारखे त्या भूभागाने धुक्याची चादर स्वतःभोवती ओढून घेतली होती. मेघांनाही गहिवरून आलं होतं. त्यामुळे सारंच वातावरण भावओले होऊन गेले होते.

डीएमझेड म्हणजे कोरियाई विसैनिकीकृत भूभाग आज पर्यटकांसाठी पर्यटनाचा आनंद क्षण वाटत असला तरी, कोरियन हृदयाला दुभांगून आपल्याच आप्तजनांना एकमेकापासून दूर करणारी ही दुभंग रेषा प्रत्येक राष्ट्रप्रेमी कोरियनांच्या मनात




कायम ठसठसणारी वेदना आहे. हे संयुक्त राष्ट्र सुरक्षा क्षेत्र असून येथे उत्तर आणि दक्षिण कोरियाचे सैनिक एकमेकांपुढे समोरासमोर येतात. येथे राजनैतिक चर्चाही होतात. पण, शांतीच्या मसुद्यावर अद्याप कधीही एकमत झालेलं नाही!

येथून जवळच पाजूमध्येच उत्तर कोरियाने दक्षिण कोरियामध्ये घुसखोरी करून आक्रमण करण्यासाठी याच सीमाभागाखालून एकूण चार बोगदे खोदले. त्यापैकी तिसरा बोगदा 1635 मीटर (एक पॉईंट सहा किलोमीटर) लांब दोन मीटर रुंद आणि दोन मीटर उंचीचा पहावयास मिळाला. या बोगद्यातून प्रति तास 30,000 सैनिक सहज प्रवेश करू शकतील एव्हढा मोठा आहे. आज हा तिसरा बोगदा पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण ठरत असला तरी, विधायक कार्यापेक्षा विघातक कामात मानवी शक्ती-भक्ती, बुद्धी आणि कृतीला वेगळीच धार येते! याचे हे हे ज्वलंत उदाहरण आहे.

कोरियाच्या लोकशाही आणि भांडवलशाही संघर्षात निष्पाप ३० लाख कोरियन नागरीक, दहा लाखापेक्षा जास्त चिनी सैनिक आणि अमेरिकेचे ३४ हजाराहून अधिक सैनिक मारले गेले. त्याच बरोबर उत्तर आणि दक्षिण कोरियातील रस्ते, शहरे आणि पायाभूत सुविधा पूर्णपणे उध्वस्त झाल्या. आज जरी हे युद्ध विसरलेले युद्ध म्हणून मानले जात असले तरी, संवेदनाशील कोरियनांच्या मनाला हा सर्वकाळ छळणारा सल आहे!

भांडवलशाही पुढे न झुकता, लोकशाहीचा मार्ग निर्भीडपणे स्वीकारणारे दक्षिण कोरियन भावनाशील, उदारमतवादी, मानवता धर्माला जागणारे, म्हणूनच भूतकाळातील जखमांना हळुवारपणे आठवणीत ठेवण्यासाठी त्यांनी डीएमझेड जवळच ग्योंगगी प्रांतात पाजू मध्ये प्योंगहवा नूरी पार्क 1972 मध्ये उत्तर आणि दक्षिण कोरियाच्या फाळणीमुळे एकमेकापासून दूर झालेल्या आप्तजनांच्या आठवणी प्रित्यर्थ साकारले आहे. येथे जवळच इम्जिन नदीवर पूल आहे. उत्तर कोरियाने युद्धबंदींना मुक्त केल्यानंतर याच पुलावरून 1953 मध्ये 12,773 दक्षिण कोरियन सैनिकांनी दक्षिण कोरियात प्रवेश केला. म्हणून यास फ्रिडम ब्रिज असेही म्हणतात. उत्तर कोरियात राहणारे ह्युंदाईचे संस्थापक मि. चुंग जू युंग यांनी देशवासीयांसाठी १००१ गाई याच पुलावरून दक्षिण कोरियात पाठवल्या होत्या म्हणून या पुलास गाईंचा पूल असेही संबोधले जाते. युद्धबंदींना आगगाडीने आणताना उत्तर कोरियाच्या सैनिकांनी ज्या आगगाडीवर अंधाधुंद गोळीबार केला होता. त्या गोळ्यांचे घाव अंगावर घेऊन उभी असलेली तीच आगगाडी आजही याच पार्कात गतकाळाची आठवण करून देत उभी आहे.

प्योंगहवा नूरी पार्क आज भूतकाळ जागवता जागवता वर्तमान काळातील आनंद केंद्र बनले आहे. इथे अनेक आकर्षक गवताळ कलाकृती कोरीयनांच्या कलागुणांची साक्ष देत उभ्या आहेत. येथे प्योंगहवा लैंड, एक छोटासे मनोरंजन पार्कही उभारण्यात आलेले आहे. दक्षिण कोरियन लोक येथे केवळ सुट्टीचा आनंद भोगण्यासाठीच नव्हे तर उत्तर कोरियात विभाजनाने ताटातूट झालेल्या आपल्याच आप्तजणांना नमन करण्यासाठी मंग मैदान वेदीवर मोठ्या श्रध्देने गोळा होतात.

1953 च्या युद्धाच्या फाळणीच्या जखमा आजही ओल्या असताना, भूतकाळाला विसरून उत्तर कोरियातील आपल्याच आप्तजनांच्या पुनर्मिलनाची आस मनात ठेवून वर्तमानकाळ मानवतेच्या जाणिवेने सजवण्याची इच्छा असलेले दक्षिण कोरियन लोकांची माणूसपण रुजवण्याची धडपड आजही जिवंत असल्याचे प्रखरतेने येथे आलेल्या प्रत्येक पर्यटकाला जाणवत रहाते. त्याचे मुर्तीमंत प्रतीक म्हणजे 'डोरा स्टेशन' डीएमझेड पासून उत्तर कोरियाच्या सीमेपासून फक्त 650 ते 700 मीटर दक्षिणेला असलेलं, दक्षिण कोरियातील ग्योंगई रेल्वे लाईनवरील हे रेल्वे स्टेशन सुसज्ज, उत्तम इमिग्रेशन आणि उत्तम कस्टम सुविधा असलेले सिओल पासून केवळ ५६ किलोमीटरवर असलेले उत्तर आणि दक्षिण कोरियाला जोडण्यासाठी तिष्ठत उभे असलेले दक्षिण कोरियातील शेवटचे तर उत्तर कोरिया कडे जाणारे पहिले स्टेशन! युद्धानंतर झालेल्या फाळणीमुळे ताटातूट झालेल्या आपल्याच पूर्वजांना भेटण्याची भाबडी आशा उरात घेऊन दक्षिण कोरियांनी 2002 मध्ये हे डोरा रेल्वे स्टेशन उभारले आहे. आजही हे स्टेशन कार्यरत आहे पण, येथे रेल्वे गाड्यांची ये-जा नाही. तरीही तुम्ही रेल्वे स्टेशन मध्ये जाऊन तिकीट घेऊ शकता! एक वेगळीच आठवण म्हणून, स्टेशन अधिकाऱ्यांकडून स्टॅम्प घेऊ शकता. येथून उत्तर कोरियाकडे रेल्वेगाडी कधी सुटेल हे जरी न उलगडणारे कोडे असले तरी हे डोरा स्टेशन भूतकाळ जागवणारे, मानवता वागवणारे, दक्षिण कोरियनांच्या मनाचा मोठेपणा घेऊन उभे असलेले विश्व शांतीचा संदेश देणारे जगभरातील पर्यटकांसाठी अलौकिक पर्यटन केंद्र ठरले आहे.

शांतता प्रिय सहजीवन हे जरी माणसाच्या अंतर्मनाची सुप्त इच्छाशक्ती असली तरी, मीपणा आणि स्वार्थाच्या वर्चस्वासाठी आज राजकारण्यांनी अखंड मानव जातीला गटबाजी आणि प्रांतवादात जखडून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वर्चस्वासाठी गटबाजीची जोरदार मोहीम सुरू केलेली असताना केवळ मानवतेच्या अपेक्षेने 'वसुधैव कुटुंबकम्' या उदात्त भावनेतून वर्तमान काळ सजावा याच अपेक्षेपूर्तीसाठी 'डोरा रेल्वेस्टेशन सहकार्याचा हात पुढे करून उभे आहे.

विश्वकल्याणासाठी, भूतकाळातील जखमांचा सल विसरून नव मानवतावादी समाजाची उभारणी व्हावी हा संदेश 'डोरा रेल्वस्टेशन' प्रत्येक पर्यटकाकडून जगभर पोहचवण्याचा प्रयत्न करत आहे. त्याची जाणीव कधीतरी आजच्या सत्तासम्राटांना होईल असं तुम्हाला तरी वाटतं का?

**लेखन....**
**पंढरीनाथ बबन भालेकर**
**1904 व्हीटीपी हायलाईफ, थेरगांव, पिंपरी-चिंचवड, पुणे-33.**

# महाराष्ट्राचा सुवर्णकाळ – वाकाटक राजवट



विदर्भ आणि महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास अत्यंत समृद्ध आहे. बौद्ध कालखंडापासून लिखित साधने उपलब्ध झाल्याने इतिहासाचा सुस्पष्ट कालक्रम सुरू होतो. या काळात भारतीय उपखंडात जनपदे आणि महाजनपदांच्या उदयासोबतच बलाढ्य साम्राज्यांची पायाभरणी झाली. प्राचीन ग्रंथांत 'विदर्भ' आणि 'अश्मक' (अस्सक) या जनपदांचा उल्लेख या प्रांताच्या राजकीय अस्तित्वाचा ठोस पुरावा म्हणून आढळतो.

मौर्य, शुंग आणि सातवाहन या साम्राज्यांच्या काळात या भूमीचा सर्वांगीण विकास झाला. याचवेळी महाराष्ट्रात पाषाण-कोरीव लेण्यांच्या निर्मितीला प्रारंभ झाला. जगातील ५० टक्के आणि भारतातील ७५ टक्के प्राचीन कातळकोरीव लेणी एकट्या महाराष्ट्रात आहेत. सातवाहन काळात रुजलेली ही लेणी-स्थापत्य परंपरा पुढे वाकाटक काळात अधिक प्रगल्भ झाली.

उत्तर भारतातील गुप्त साम्राज्याच्या सुवर्णकाळाला समकालीन असणाऱ्या वाकाटक साम्राज्याचा उदय महाराष्ट्रात झाला. या प्रबळ राजवटीने महाराष्ट्राच्या राजकीय, सांस्कृतिक आणि कलात्मक वैभवाला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवले.

महामहोपाध्याय वा.वि. मिराशी, डॉ. अजयमित्र शास्त्री आणि प्रो. वॉल्टर स्पिंक यांच्या संशोधनामुळे हा गौरवशाली इतिहास जागतिक पटलावर आला. विशेषतः प्रो. स्पिंक यांनी ६६ वर्षे अजिंठा संशोधनाला वाहून वाकाटक काळ हा भारताचा 'सुवर्णकाळ' असल्याचे सप्रमाण सिद्ध केले. हान्स बाकर यांनी नंदिवर्धन शाखेवर सखोल प्रकाश टाकून या इतिहासात मोलाची भर घातली.

**उदय व राजकीय विस्तार**

महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासातील वाकाटक घराणे हे एक प्रगत आणि वैभवशाली साम्राज्य होते, ज्याची माहिती पुराणे, ताम्रपट व शिलालेखांतून मिळते. या वंशाचा मूळ पुरुष 'वाकाटक' (इ.स. २००) असून, विंध्यशक्तीने इ.स. २५० मध्ये स्वतंत्र राज्याची स्थापना केली. अजिंठ्याच्या शिलालेखावरून हे घराणे 'विष्णुवृद्ध' गोत्री ब्राह्मण असल्याचे स्पष्ट होते. विंध्यशक्तीनंतर त्याचा पराक्रमी पुत्र पहिला प्रवरसेन (इ.स. २७५-३३५) सत्तेवर आला, जो या वंशातील सर्वाधिक महत्त्वाकांक्षी सम्राट ठरला. पहिल्या प्रवरसेनाने आपल्या पराक्रमाने साम्राज्याचा विस्तार करून 'सम्राट' ही पदवी धारण केली. त्याच्या सुमारे ६० वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीनंतर साम्राज्याचे चार पुत्रांमध्ये विभाजन झाले. मुख्य शाखेची राजधानी नागपूरजवळील 'नंदिवर्धन' (नगरधन) येथे होती, तर दुसरी शाखा 'वत्सगुल्म' (वाशीम) येथे स्थिरावली. उर्वरित दोन शाखा कालांतराने लयास गेल्या.

**गुप्त-वाकाटक संबंध**

वाकाटकांच्या इतिहासात गुप्त घराण्याशी प्रस्थापित झालेले राजकीय संबंध हा एक अत्यंत निर्णायक टप्पा ठरला. नंदिवर्धन शाखेचा राजा दुसरा रुद्रसेन (इ.स. ३८५-३९०) याचा विवाह गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्य यांची कन्या प्रभावती-गुप्त हिच्याशी झाला आणि या दोन बलाढ्य सत्तांमध्ये मैत्रीचे नवे पर्व सुरू झाले. रुद्रसेनाच्या अकाली निधनानंतर, प्रभावती-गुप्तने आपल्या अल्पवयीन पुत्राच्यावतीने राज्यकारभार अत्यंत कुशलतेने सांभाळला. या कालखंडात पिता आणि पुत्री एकाच वेळी दोन भिन्न साम्राज्यांचे शासन करत असल्याचे एक अद्वितीय चित्र दिसते. गुप्त-वाकाटकांच्या या सौहार्दपूर्ण संबंधांमुळे विदर्भातील सांस्कृतिक, कलात्मक आणि साहित्यिक प्रगतीला मोठी चालना मिळाली.

धार्मिक सहिष्णुतेचा सुवर्णकाळ सांस्कृतिक, धार्मिक आणि कलात्मक दृष्टिकोनातून वाकाटकांचा कालखंड हा केवळ विदर्भाचाच नव्हे, तर महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने भारताच्या प्राचीन इतिहासातील खऱ्या अर्थाने 'सुवर्णकाळ' मानला जातो. नंदिवर्धन शाखेचे राजे निस्सीम शिवोपासक असूनही राणी प्रभावती-गुप्तच्या आगमनाने वैष्णव पंथालाही तितकाच सन्मान आणि राजाश्रय लाभला. दुसरीकडे, वत्सगुल्म शाखेच्या राजांनी अजिंठा व घटोत्कच यांसारख्या जगप्रसिद्ध बौद्ध लेण्यांची निर्मिती केली. या धार्मिक सहिष्णुतेतूनच विदर्भाच्या भूमीत शैव, वैष्णव आणि बौद्ध अशा तिन्ही विचारधारांचा अभूतपूर्व संगम झाला. त्याशिवाय वाकाटक राजांनी विद्वान पंडितांना ग्रामदाने देऊन ज्ञान आणि विद्येची जोपासना केली.

**नगरधन (नागपूर) येथील नंदिवर्धन शाखा**

मनसर येथील उत्खननात आढळून आलेला भव्य त्रिमजली राजप्रासाद दुसरा प्रवरसेन (इ.स. ४१०-४४०) याच्या काळातील आहे. याच राजाने आपली राजधानी नंदिवर्धनहून प्रवरपूर येथे स्थलांतरित केल्याने मनसरची ओळख प्राचीन प्रवरपूर म्हणून निश्चित झाली आहे.

रामटेक येथे वाकाटककालीन वराह, त्रिविक्रम, केवल नरसिंह व रुद्र नरसिंह ही मंदिरे आजही पाहायला मिळतात. यातील केवल नरसिंह मंदिरातील प्रभावती-गुप्त यांच्या शिलालेखात वाकाटक राजघराण्याची सविस्तर वंशावळ नमूद आहे. नजीकच्या नगरधन येथील उत्खननातून हेच वाकाटकांचे नंदिवर्धन असल्याचे सिद्ध झाले असून, तेथील अवशेष, नाणी आणि 'श्री प्रभावती गुप्त' असे अंकन असलेली ब्राम्ही लिपीतील मुद्रा या तर्काला ठोस दुजोरा देतात. याशिवाय हमलापुरी (नागपूर), पवनार (वर्धा), नागरा (गोंदिया), पवनी (भंडारा), भद्रावती, भटाळा आणि देऊळवाडा (चंद्रपूर) येथील पुरातत्त्वीय अवशेषांवरून वाकाटक साम्राज्याचा विस्तीर्ण विस्तार अधोरेखित होतो.

**वाशीम येथील वत्सगुल्म शाखा**

वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेची स्थापना चौथ्या शतकाच्या मध्यास पहिल्या प्रवरसेनाचा पुत्र सर्वसेन (इ.स. ३३०-३५५) याने केली. पुढे सम्राट हरिषेण (इ.स. ४६०-४७७) याच्या काळात या साम्राज्याने वैभवाचे शिखर गाठले. त्याने माळव्यापासून कुंतलपर्यंत आणि कोकणापासून आंध्रपर्यंत आपले एकछत्री वर्चस्व निर्माण केले होते. जरी त्याच्या मृत्यूनंतर या राजवटीचा अस्त झाला, तरीही अजिंठ्यातील अद्भुत लेणे-विश्व, तेथील पाषाणशिल्पे आणि जिवंत चित्रशैलीच्या रूपाने वाकाटकांचा देदीप्यमान वारसा आजही अजरामर आहे.

**अजिंठ्याचे अद्भुत कलाविश्व**

वाकाटकांच्या कलाप्रेमाचा सर्वोच्च आविष्कार म्हणजे अजिंठ्यातील लेणी. विशेषतः सम्राट हरिषेणच्या काळात या लेण्यांना प्राप्त झालेले स्वरूप मानवी कल्पकतेच्या पलीकडचे आहे. येथील चित्रशैली इतकी जिवंत आहे की, ती जागतिक स्तरावर 'एकमेव अद्वितीय' मानली जाते. नैसर्गिक रंगांत साकारलेल्या असंख्य जातककथा आणि त्यांतील उत्कट भाव हे वाकाटककालीन कलाकारांच्या अफाट कौशल्याची साक्ष देतात. या लेण्यांमधील चित्रांमधून तत्कालीन प्रगत सामाजिक जीवनाचे दर्शन घडते. स्त्रियांचे अलंकार, केशरचना आणि वेशभूषेतील वैविध्य ही त्या काळातील संपन्नतेची लक्षणे आहेत. राजदरबारातील दृश्ये आणि नृत्यांगनांचे हावभाव यांतून एका सुरक्षित, सुसंस्कृत आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध अशा 'सुवर्णकालीन' महाराष्ट्राचे चित्र उभे राहते.

**वैदर्भी साहित्य आणि संस्कृतीचा सुवर्णोदय**

साहित्याच्या दृष्टीने वाकाटक काळ हा खऱ्या अर्थाने 'सुवर्णकाळ' होता. याच काळात महाकवी कालिदासांनी रामगिरी (रामटेक) येथे 'मेघदूत' या अजरामर काव्याची निर्मिती केली. या कालखंडात विकसित झालेल्या रसाळ 'वैदर्भी' काव्यशैलीची दंडी आणि वामन यांसारख्या आलंकारिकांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. विशेष म्हणजे, वाकाटक राजे स्वतः थोर साहित्यप्रेमी होते; दुसऱ्या प्रवरसेनाने 'सेतुबंध' तर सर्वसेनाने 'हरिविजय' यांसारखी प्राकृत महाकाव्ये रचून साहित्यात मोलाची भर घातली.राजकीय स्थैर्य, धार्मिक सहिष्णुता, वाङ्मयीन वैभव आणि अद्वितीय कलाविष्कार यांमुळे वाकाटक कालखंड हा महाराष्ट्राच्या इतिहासातील खऱ्या अर्थाने 'सुवर्णकाळ' म्हणून सार्थ ठरतो.

# डासांना आकर्षित करणारी रोपे

उन्हाळ्यात बऱ्याच ठिकाणी अवकाळी पाऊस येतो. यामुळे या दिवसात डासांचा प्रादुर्भाव वाढतो. परिणामी उन्हाळ्यात डेंग्यू, मलेरिया, आणि चिकनगुणिया यासारखे आजार बळावतात. यामुळे आपण डास पळवण्यासाठी स्प्रे, कॉईलचा वापर करतो. पण तरीही डासांचा त्रास होतो. अशावेळी तुम्ही घरात किंवा तुमच्या आसपास कोणती झाडे आहेत ते तपासावे. कारण काही झाडं, वनस्पती डास आणि किटकांना आकर्षित करतात. अशा झाडांवर मोठ्या प्रमाणात डासांची पैदास होते.


ही झाडे दिसायल हिरवेगार आणि आकर्षक असतात. यामुळे काहीजण होमडेकोरसाठीही अशा झाडांचा नकळत वापर करतात. ही झाडे पाण्यावर जगणारी असतात. कोणती आहेत ही झाडे ते पाहूया.

## वॉटर लिली



वॉटर लिली हे पाणवनस्पती आहे. पाणी शुद्ध करण्यासाठी तिचा वापर केला जातो. यामुळे काहीजण घरातील तलावात, फवाऱ्यांच्या ठिकाणी , पाण्याने भरलेल्या कुंड्यामध्ये वॉटर लिली लावतात. याच्या सुंदर आकर्षक पानांकडे किटक-डास आकर्षित होतात. यावरच अंडी घालतात. त्यामुळे या वनस्पतीवर कायम डास असतात.

## बांबूचे झाड



बांबूचे झाडाकडे डास चुंबकाप्रमाणे आकर्षित होतात. घराच्या सजावटीसाठी अनेक जण घरात बांबूचे झाड ठेवतात. बांबूच्या झाडाची वाढ झपाट्याने होते. पण आतून पोकळ असल्याने याच्या आजूबाजूला पाणी साचते. याच पाण्यात डासांचा मुक्काम असतो. यामुळे बांबूचे झाडाच्या जवळपास स्वच्छता ठेवावी लागते.

## केळ्याचे झाड



केळ्याची पानं लांब असतात. त्यामुळे बऱ्याचवेळा त्यावर पाणी जमा होते. तसेच केळ्याच्या बुंध्याशी असलेली माती कायम ओली असते. त्यामुळे डास या मातीत स्थिरावतात. अंडी घालतात. त्यामुळे केळीच्या बागा किंवा त्याच्या झाडाच्या आसपास सतत डासांचा प्रादुर्भाव असतो.